# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७ / फाल्गुन २४, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७८**

---

### पुणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत

**(१) * २७४४७ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५४२ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्हयाचा वेगाने होणारा विकास विचारात घेता या ठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणे आवश्यक असून विमानतळ व्हावे याकरिता सुमारे दहा वर्षापूर्वीपासून शासनाकडून कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरंदर (जि.पुणे) येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी किती निधीची आवश्यकता आहे, या प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) पुणे विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील जागेची निश्चिती व प्रकल्प सुसाध्यता अहवाल याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील इसबावी उपनगरातील वैष्णवीनगर भागातील भुयारी गटार योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२) * २९७५० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील इसबावी उपनगरातील वैष्णवीनगर भागातील भुयारी गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्याने गटारीचे सांडपाणी वैष्णवीनगर भागात साचल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरुन येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत मंजूर भुयारी गटार (टप्पा-२) प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे.

इसबावी उपनगरातील वैष्णवीनगर भागातील भुयारी गटार योजनेचे काम नगरपरिषदेने स्वनिधीतून हाती घेतले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) या भागातील स्थानिक नागरीकांनी व जमिनधारकांनी कामामध्ये अडथळा आणलेने सदर काम अपूर्ण आहे.

याबाबत जिल्हाधिकारी यांच्यावतीने जिल्हा प्रशासन अधिकारी व मुख्याधिकारी यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन जमिनधारकांशी चर्चा केली.

जमिनधारकांशी चर्चेनंतर सदर भुयारी गटार योजनेचे काम चालु केले असून मे, २०१७ अखेर पूर्ण करण्यात येईल.

-----------------

## कल्याण-डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ शहरातील नागरिकांचे प्रदुषणामुळे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३) * २६८९७ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ (जि.ठाणे) शहरातील रस्त्यावरील वाहनांची अहोरात्र वर्दळ, दगडखाणी आणि हजारो कंपन्यांमधून सोडण्यात येत असलेल्या धुरामुळे ही शहरे सर्वाधिक प्रदुषित शहर असल्याचे मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शहरातील प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शहरांतील प्रदुषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व बदलापूर नगरपरिषद यांच्याकडून शहरातील नागरीकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------

## मुंबईतील खाजगी विकासकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दिलेल्या भूखंडाचा विकास न केल्याबाबत

**(४) * २६७९९ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.नारायण राणे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टयासंबंधी खाजगी भूखंडधारकांनी त्यावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर न केल्यास असे भूखंड ताब्यात घेण्याविषयी मा.मुख्यमंत्री यांनी घोषणा करणे, परंतु अद्याप एकही भूखंड ताब्यात घेण्यात आलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकही भूखंड ताब्यात न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ज्या विकासकाने झो.पु. योजनेंतर्गत झोपडपट्टी असलेले भूखंड विकसित केले नाहीत त्यांच्यावर दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी प्राधिकरणाच्या दिनांक १/१२/२०१३ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीतील ठराव क्र.१३:१:१ अन्वये खाजगी ट्रस्ट व धर्मादाय संस्था यांच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टयांची योजना सादर करण्यासंदर्भात मुदत देऊन व त्या मुदतीत संबंधितांनी योजना सादर न केल्यास या झोपडपट्टीव्याप्त जमिनी झोपडपट्टी अधिनियमातील तरतूदीनुसार भूसंपादन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार एकुण ५ ट्रस्ट व ३ खाजगी कंपनी यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिनांक १६/६/२०१५ व दिनांक ३०/६/२०१५ अन्वये नोटीस देण्यात आल्या आहेत.
(२), (३) व (४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या नोटीसी संदर्भात ५ ट्रस्ट व एका कंपनीने लेखी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी भूसंपादनास विरोध दर्शविला आहे. यापैकी ए.एच. वाडीया ट्रस्टने प्राधिकरणाच्या नोटीस विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२७६३/२०१५ दाखल केली आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व झोपडपट्टी बाधित क्षेत्राचे क्लस्टर निहाय जी.पी.एस.-ई.टी.एस. तंत्रप्रणालीद्वारे सर्व्हेक्षण पुर्ण करण्यात आले, त्यानुसार अंतिमत: ५५५.९० एकर खोती जमिनीवर झोपडपट्टी असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्राधिकरणामार्फत पहिल्या टप्प्यात १०००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या क्षेत्राचे भूसंपादन करणेचे नियोजन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार एकुण ८ प्रस्ताव संबंधित नगर भूमापन अधिकारी यांचेकडे संयुक्त मोजणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. या मोजणीनंतर महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याचे व कलम १४ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**मुंबई शहरात गरज नसलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यास महानगरपालिकेने मान्यता दिल्याबाबत**

**(५) * २६८५० श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नारायण राणे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात गरज नसलेल्या रस्त्यांची दुरुस्ती दाखवून तसेच यामधील बहुतांशी रस्ते काही महिन्यापूर्वीच तयार करण्यात आले असताना पुन्हा सुमारे ९० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मुंबई महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच महापालिका आयुक्त, मुंबई यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्यावर्षी महानगरपालिकेच्या रस्ते गैरव्यवहाराची चौकशी प्रलंबित असताना घाईघाईने प्रस्ताव मंजूर करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरातील रस्त्यांच्या सद्य:स्थितीची प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांचे पृष्ठभाग दुरवस्थेत असलेले व दोषदायित्व कालावधी/ पुनर्बांधणी प्रकल्पामध्ये समाविष्ट नसलेल्या रस्त्यांची यादी संकलित करुन सदर रस्त्यांच्या दुरुस्तीच्या रुपये ८२.१८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास जानेवारी, २०१७ मध्ये महानगरपालिकेच्या स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी विहित ई-निविदा प्रक्रिया अवलंबिण्यात येऊन सदर प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे.

तथापि, सन २०१६ मध्ये निदर्शनास आलेल्या रस्ते गैरव्यवहार प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळवा, मुंब्रा (जि.ठाणे) भागात सार्वजनिक शौचालयाची संख्या वाढविण्याबाबत**

**(६) * २८३२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा, मुंब्रा (जि.ठाणे) भागामध्ये झोपडयांची संख्या मागील काही वर्षामध्ये वाढली असून वाढत्या झोपडपट्टीच्या तुलनेत सार्वजनिक शौचालयाची संख्या कमी पडत असल्याने ठाणे महापालिका हगणदारी मुक्त होणार नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहर हगणदारीमुक्त करण्यासाठी प्रशासनाने स्वच्छ भारत अभियानांतर्गत उपक्रम हाती घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कळवा, मुंब्रा (जि.ठाणे) या भागामध्ये झोपड्यांच्या संख्येत मागील काही वर्षात वाढ झालेली आहे, ही वस्तूस्थिती आहे.

या भागातील झोपड्यांमधील बऱ्याच घरांमध्ये वैयक्तिक शौचालये नागरीकांमार्फत बांधण्यात आली आहेत.

तसेच, ज्या कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय बांधण्यास जागा उपलब्ध असेल तर अशा कुटुंबांना स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या भागामधील ज्या कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय बांधण्यास जागा उपलब्ध नाही अशा कुटुंबांना महानगरपालिकेमार्फत सामुदायिक शौचालयांच्या ३०५३ सिटस् व सार्वजनिक शौचालयांच्या २७२ सिटस् उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(२) ठाणे शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत वैयक्तिक व सामुदायिक शौचालयांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याअंतर्गत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

ज्या कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे अशा ५५३३ कुटुंबांना वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्यात आली असून ५८७ वैयक्तिक शौचालयाची कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच, ज्या कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही अशा कुटुंबांसाठी महानगरपालिकेमार्फत सामुदायिक शौचालयांची २०० सिटस् चे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महागाव व पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेत अपात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येत असल्याबाबत**

**(७) * २८२८३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव व पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेत निकष डावलून अपात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच घरातील तीन-तीन सदस्यांना तसेच ज्यांच्याकडे पक्के घर आहे त्यांनाही याचा लाभ दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी अधिकारी तसेच ग्रामसेवकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजना ४ घटकांतर्गत नागरी भागात राबविण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत १४२ शहरांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये पांढरकवडा शहराचा समावेश करण्यात आलेला आहे. पाढंरकवडा शहरामध्ये योजनेचे निकष डावलून अपात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, या योजनेंतर्गत महागाव शहराचा समावेश करण्यात आलेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाथरी (जि.परभणी) येथील दरोडयांच्या वाढत्या घटनांबाबत**

**(८) * २७४९५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (जि.परभणी) येथील आदर्श नगर, इंदिरा नगर, गुलशन नगर, गुलजार नगर या वसाहतीत मागील तीन महिन्यात सुमारे ८-१० दरोडे व चोरीच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त घटना येथील पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस निरीक्षक व यंत्रणा यांच्या अकार्यक्षमतेची वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यांना निलंबित करण्याबाबत जिल्हा पोलीस प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पाथरी पोलीस स्टेशन येथे सन २०१६ मध्ये दरोड्याचे ३ गुन्हे दाखल असून तिन्ही गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच जबरी चोरीचे २ गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्हे उघडकीस आले आहेत. सन २०१७ मध्ये दरोड्याचा १ गुन्हा दाखल असून सदर गुन्हा उघडकीस आला आहे. तसेच जबरी चोरीचा १ गुन्हा दाखल असून सदर गुन्हा उघडकीस आला आहे.

(२) हे खरे नाही.

गुन्हे घडू नयेत याकरीता ग्रामसंरक्षण दल, पोलीस मित्र यांच्या मदतीने वेळोवेळी अचानक नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन आयोजन करुन पोलीस स्टेशन हद्दीत प्रभावी रात्रगस्त करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील अंमलीपदार्थांची होणारी तस्करी रोखण्याबाबत**

**(९) * २८१४० श्री.सुजितसिंह ठाकूर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अंमलीपदार्थ तस्करी प्रकरणी अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागातील प्रविणीता वासनीक या महिला पोलीस शिपायास दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमलीपदार्थाची तस्करी करणाऱ्यांना मदत करणारी महिला पोलीस शिपाई तसेच संबंधित खात्यातील उच्च अधिकारी यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईत गत २ वर्षात वाढत्या अंमलीपदार्थ तस्करीच्या घटना रोखण्यासाठी, कार्यरत रॅकेट नष्ट करण्याबाबत तसेच अंमलीपदार्थ प्रतिबंधक विभागातील पोलीस अधिका-यांचे ड्रग माफियांबरोबर असलेले संबंध नष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंमलीपदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी अशी कोणतीही कारवाई केलेली नाही.

तथापि, नारर्कोटीक्स कंट्रोल ब्युरो, गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दिनांक ११/०१/२०१७ रोजी अशा स्वरुपाची कारवाई केली आहे.

(३) ड्रग्जच्या तस्करी विरोधात सतत कारवाई करण्यात येते. त्यासाठी सहपोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या अधिपत्याखाली अंमलीपदार्थ विरोधी कक्ष कार्यरत असून, पोलीस उप आयुक्त, अंमलीपदार्थ कक्ष हे कक्षाचे प्रभारी म्हणून काम पहातात. मुंबई प्रादेशिक विभागात एकूण ५ घटक कार्यालये आहेत. प्रत्येक घटक कार्यालयात पोलीस निरीक्षक हे प्रभारी असून त्यांचे अधिपत्याखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक व अंमलदार नेमणूकीस आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------------

## नागपूर येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी वसाहत निर्माण करण्याबाबत

**(१०) * २७३२२ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी वसाहत निर्माण करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीसाठी शासनाकडून किती निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे व सदर वसाहत किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नागपूर येथे पोलीसांसाठी एकूण चार ठिकाणी ५८८ निवासस्थाने बांधण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सदर बांधकामासाठी एकूण रुपये २१२.५८ कोटी इतक्या निधीपैकी रुपये ८८.८९ इतका निधी देण्यात आला आहे. तसेच, पोलीसांसाठी सुमारे ४२१८ निवासस्थाने बांधण्याची प्रक्रिया नियोजन स्तरावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या सीमा भागातील सुमारे ३४ गावांचा महानगरपालिका हद्दीत समावेश करणेबाबत

**(११) * २९८५७ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या सीमा भागातील सुमारे ३४ गावे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करुन घेणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सीमा भागातील ३४ गावातील नागरिकांनी पुणे महानगरपालिका हद्दीत त्या गावांचा समावेश करण्याबाबत वेळोवेळी सनदशीर मार्गाने विनंती व निवेदने संबंधिताना दिली असून याबाबत आंदोलने ही केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांचा पुणे महानगरपालिका हद्दीत समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेच्या सीमा भागातील ३४ गावे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट करण्याबाबत दिनांक २९/५/२०१४ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.
(२) पुणे महानगरपालिकेच्या सीमा भागातील ३४ गावे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याबाबत तसेच समावेश होऊ नये म्हणून विनंती व निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(३) दिनांक २९/५/२०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी सादर कलेल्या अहवालाची तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वाहतूक पोलिसांच्या गैरव्यवहाराबाबत**

**(१२) * २६७६० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.रविंद्र फाटक, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाहतूक पोलीस कारवाईच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करतात असा आरोप करणारी जनहित याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अतिरिक्त महासंचालक यांचे निरीक्षणाखाली करुन ६ आठवडयात अहवाल सादर करण्याचे आदेश मा. न्यायालयाने शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) अतिरीक्त पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या देखरेखीखाली याचिकेत नमूद आरोपांची चौकशी करून सदर चौकशी बाबतचा प्रगती अहवाल दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीमध्ये सादर करण्याचे निर्देश मा.न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे चौकशी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वणी (जि.यवतमाळ) नगरपरिषदेने अतिक्रमण हटाव मोहिम राबविल्याबाबत**

**(१३) * २९६६९ श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) शहरात नगरपरिषदेकडून अतिक्रमण हटाव मोहिम माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिक्रमण विरोधी पथकाकडून कारवाई करताना अवैध व्यावसायिकांचे रस्त्यावरील अतिक्रमण वगळून गोरगरिबांची घरे तोडण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार गोरगरिबांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) डिसेंबर, २०१६ तसेच जानेवारी २०१७ या कालावधीत तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, भुमि अभिलेख कार्यालय व पोलीस प्रशासनामार्फत संयुक्तरित्या अतिक्रमण मोहिम हाती घेण्यात आली होती, यामध्ये रस्त्यावरील अतिक्रमणे तसेच शासकीय जमिनीवरील अतिक्रमण काढण्यात आले. सदर मोहिमेत नियोजनबध्दरित्या अतिक्रमणे काढण्यात आली असून त्यात कोणताही भेदभाव करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईत म्हाडाच्यावतीने काढण्यात आलेल्या सोडतीतील अर्जदारांना घराचा ताबा मिळणेबाबत

**(१४) * २७५६२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्यावतीने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आलेल्या सोडतीतील सुमारे ३६७ अर्जदारांना संपूर्ण रक्कम भरूनही घराचा ताबा मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींना ओसी न मिळाल्यामुळे ह्या घरांचा ताबा अर्जदारांना मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अर्जदारांना घराचा ताबा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, मुंबई मंडळाच्या मे, २०१५ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमधील संकेत क्रमांक ३१२ गव्हाणपाडा, मुलूंड, मध्यम उत्पन्न गटातील एकूण १८५ सदनिका व संकेत क्रमांक ३१३ गव्हाणपाडा, मुलूंड, अल्प उत्पन्न गटातील एकूण १८२ अशा एकूण ३६७ सदनिकांचा समावेश होता. संकेत क्र. ३१२ मधील १८५ यशस्वी अर्जदारांपैकी सद्य:स्थितीत १७० अर्जदार पात्र ठरले असून उर्वरित १५ सदस्यांच्या पात्रता निश्चितीचे काम सुरु आहे. तसेच संकेत क्र. ३१३ मधील १८२ यशस्वी अर्जदारांपैकी सद्य:स्थितीत १७४ अर्जदार पात्र ठरले असून उर्वरित ०८ सदस्यांच्या पात्रता निश्चितीचे काम सुरु आहे. संकेत क्र. ३१२ व ३१३ मधील एकूण ३४४ पात्र अर्जदारांपैकी कुणीही म्हाडाकडे अद्यापपर्यंत सदनिकेपोटी रक्कमेचा भरणा केलेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

संकेत क्रमांक ३१२ गव्हाणपाडा, मुलूंड, मध्यम उत्पन्न गटातील इमारतींना दिनांक २५/०१/२०१७ रोजी भोगवटा प्रमाणपत्र झालेले आहे. पात्र अर्जदारांना सदनिकेच्या रक्कमेचा भरणा करण्यासाठी तात्पुरते देकारपत्र देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

संकेत क्रमांक ३१३ गव्हाणपाडा, मुलूंड, अल्प उत्पन्न गटातील इमारतींना अद्यापपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

वाडीव-हे **(ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील कुटुंबाला आंतरजातीय विवाह केल्यामुळे वाळीत टाकल्याबाबत**

**(१५) * २७६४५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडीव-हे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील अनिल बोराडे आणि पुजा भाडमुखे यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी आंतरजातीय विवाह केल्याने श्री.बोराडे यांच्या कुटुंबाला गावाने वाळीत टाकल्यामुळे सदर कुटुंब गाव सोडुन गेल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

(२) अनिल बोराडे व पुजा भाडमुखे हे दिनांक ६/१२/२०१६ रोजी घरातून बेपत्ता झाले होते. अनिल बोराडेचा शोध घेण्यासाठी घरातील सदस्य बाहेर गावी गेले असता, दिनांक ११/१२/२०१६ रोजी त्याचे राहते घर जळाल्याने सुमारे ६०,०००/- रु.चे नुकसान झालेले आहे. सदर प्रकरणी वाडीव-हे पोलीस स्टेशन गु.र.नं.I २८८/२०१६ भादंवि कलम ४५२, ४३६, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुजा ही अनिल बोराडे सोबत पळून गेली असल्याचे तिच्या घरच्यांना माहित असल्याने व पुजाच्या घरच्यांचा अनिल बोराडेस विरोध असल्याने त्यांनीच आपल्या घराला आग लावली असल्याचा संशय अनिलचे वडील बाळू बोराडे यांनी व्यक्त केला आहे. परंतु तपासात संशयिताविरोध्द कोणताही पुरावा उपलब्ध झालेला नाही.

पुजा बेपत्ता झाल्याने वाडीव-हे पोलीस ठाणेस मनुष्य मिसींग रजि.नं. ३६/२०१६ प्रमाणे दाखल करण्यात आली होती. तपासात कु. पुजा शिवाजी भाडमुखे ही सज्ञान असून तिने स्वेच्छेने शेजारी राहणारा अनिल बाळु बोराडे यांचे सोबत पळुन जावून प्रेम विवाह केलेला आहे. विवाहनंतर ते स्वत: पोलीस ठाणेस हजर झाले आहे व त्यांचे इच्छेनुसार दिनांक १२/१२/२०१६ रोजी शेवेगेडांग ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे राहवयास गेले आहेत असे चौकशी निष्पन्न झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इंदिरा गांधी शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रुग्णालय (मेयो) नागपूर येथील अधिष्ठाता यांना लाच स्वीकारताना अटक केल्याबाबत**

**(१६) * २८९७४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रुग्णालय (मेयो) नागपूर येथील अधिष्ठाता यांना औषध पुरवठा करणाऱ्या विक्रेत्याचे बिल मंजूर करण्यासाठी १५ हजाराची लाच स्वीकारताना अटक केल्याची घटना दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अधिष्ठाता यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रूग्णालय, नागपुर व खाजगी इसम यांचेविरूध्द लाचेच्या सापळा प्रकरणी पोलीस स्टेशन, तहसिल, नागपुर शहर येथे दिनांक १६/०१/२०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील तरतुदीनुसार गु.र.क्र. ३०१३/२०१७ दाखल करण्यात आला आहे. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रूग्णालय, नागपुर यांना दिनांक २०/०१/२०१७ च्या शासन आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी झोपडपट्टीवासियांना थेट भूखंडाचा मालकी हक्क देण्याबाबत**

**(१७) * २६७९०  श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नारायण राणे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर, मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवडसह सर्व शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी झोपडपट्टीवासियांना थेट भूखंडाचा मालकी हक्क देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे मिळण्याकरीता संबंधित झोपडीधारकांना मालकी हक्काचे उतारे जिल्हाधिकारी देत नसल्याने या योजनेचा लाभ मिळण्यास झोपडीधारकास अडचणी येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय जागेवर राहत असलेल्या कुटुंबांना मालकी हक्काचे उतारे देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहेत काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) पात्र झोपडपट्टीवासियांना त्यांच्या भोगवट्याखालील जमीन भाडेपट्टावर देऊन किंवा पर्यायी भूखंड देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतच्या शासनाच्या दिनांक १०/७/२००२ च्या शासन निर्णयामध्ये शासनाच्या दिनांक १६/७/२०१६ व दिनांक ३/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र, सदर शासन निर्णयातील तरतूदी मुंबई, ठाणे, पुणे व पिंपरी-चिंचवड या शहरांना लागू नाहीत.

(२) हे खरे नाही,

(३) व (४) मा. उच्च न्यायालयाने, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २८/१/२०११ च्या सार्वजनिक वापरातील जमिनी/गायरान जमिनी इतर प्रयोजनार्थ वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबतचा निर्णय तसेच त्या संदर्भातील शासनाच्या महसूल विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/७/२०११ चा शासन निर्णयाच्या अनुषंगाने सत्वर उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिनांक २३/६/२०१५ रोजी दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षकांना होणाऱ्या मारहाणीबाबत**

**(१८) * २७५९६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३४९९ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना होणाऱ्या मारहाण प्रकरणी गुन्हे नोंद करण्यात येणाऱ्या भारतीय दंड संहितेच्या कलम ३३२ व ३५३ मध्ये सुधारणा करण्यासंबंधीची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना मारहाणीचे प्रकार घडत असून राज्यात ठिकठिकाणी कर्तव्यावर असलेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांना देखील पालक, विद्यार्थी व बाहेरील गुंडांकडून मारहाणीचे प्रकार सातत्याने घडत असल्याच्या पार्श्वभुमीवर शिक्षकांचे सुरक्षिततेचे दृष्टीकोनातून विशेष तरतुदींचा अंतर्भाव प्रचलित कायद्यात व्हावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटना व अन्य शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) भारतीय दंड संहितेच्या कलम ३३२ व ३५३ मध्ये सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील अग्निशमन दल सर्व यंत्रसामुग्रीनी सुसज्ज करण्याबाबत**

**(१९) * २७०६६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात असलेल्या इमारती व त्यांची उंची यांच्या प्रमाणात अग्निशमन दलाकडे सुसज्ज यंत्रसामुग्री नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पुणे शहरातील अग्निशमन दल सर्व यंत्रसामुग्रीनी सुसज्ज करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत श्री.संजय काकडे, मा.लोकसभा सदस्य यांचे दिनांक १८/१२/२०१६ रोजीचे पत्र पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) पुणे शहरात विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार १०० मी. उंची पर्यंत इमारतींसाठी ना हरकत प्रमाणपत्र/बांधकाम आराखडयांना मान्यता देण्यात येते.

तथापि, केवळ ७० मी. उंचीपर्यंत जाणारी शिडी असलेली हायड्रॉलिक प्लॅटफार्म वाहने पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे सध्या उपलब्ध आहेत.

अग्निशमन सेवेचे बळकटीकरण करण्यासाठी २१ नविन अग्निशमन केंद्रे उभारणे, वाहने व उपकरणांची पूर्तता तसेच कर्मचाऱ्यांची भरती याकरिता पुणे महानगरपालिकेच्यावतीने येत्या अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतूद करण्याचे नियोजन असून पुढील ५ वर्षाच्या कालावधीत कालबध्द कार्यक्रम आखून त्याव्दारे आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील पोलीस कुटुंबियांसाठी पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्याबाबत

**(२०) * २८९४४ ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील २ लाख २० हजार पोलीस कुटुंबियांसाठी पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना फक्त सेवेतील पोलिसांना मिळत असून सुमारे पावणे दोन लाख सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांना मिळत नसून ही योजना त्यांनाही मिळावी यासाठी त्यांच्याकडून शासनाकडे वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाच्या दर्जानुसार काही विशिष्ट रक्कम भरल्यानंतरच पोलीस रुग्णाला दाखल करुन घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने सदर आरोग्य योजनेचा लाभ कार्यरत पोलीस व सेवानिवृत्त पोलीस कुटुंबियांना मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची सेवा एक वर्षापेक्षा जास्त झाली आहे अशा पोलीस अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींकरीता राबविण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींकरीता नि:शुल्क औषधोपचार देण्यात येतो, तथापी रुग्णांनी रुग्णालयात दाखल होते वेळी अनामत रक्कम घेतले बाबत तीन तक्रारी प्राप्त झाले असून त्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना आरोग्य योजना लागू करण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकाम कामगारांच्या सुरक्षेबाबत

**(२१) * २७९२६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात बंदी असूनही रावेत, किवळे, वाकड, तळवडे, रुपीनगर तसेच अन्य ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु असून या बांधकामांवर काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना केली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा जाळ्या, हेल्मेट, बेल्ट, पॅड इत्यादी साधने नसल्याने कामगारांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असूनही याकडे ठेकेदार आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे तसेच बांधकाम ठेकेदार कामगारांवरील खर्चात जास्तीत जास्त कपात करुन नफा कमविण्याच्या हेतूने कामगारांच्या जीवाशी खेळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा बांधकाम ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) कामगारांच्या सुरक्षेबाबतची उपाययोजना न केलेबाबत कोणतीही तक्रार माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान कामगार कार्यालयास प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील सायबर गुन्ह्याला आळा घालण्याबाबत

**(२२) * २८५८० श्री.अमरिशभाई पटेल, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने रोकड रहित (Cashless Economy) व्यवहारांमध्ये रोख रक्कम वापर न करता धनादेश, क्रेडिट व डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, पेमेंट बँक्स, मोबाईल वॉलेटस इत्यादी डिजिटल माध्यमांद्वारे व्यवहार करणाऱ्या धोरणाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दिवसेंदिवस सायबर गुन्हयांमध्ये वाढ होत असून या गुन्हयांचा तपास कमी प्रमाणात होत असल्याने राज्य शासनाने कॅशलेस धोरणामुळे सायबर सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील वाढत्या सायबर गुन्हयांला आळा घालण्यासाठी तपासासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सायबर गुन्हे घडलेल्याबाबत शोध व शिक्षा देण्यासंबंधी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व गुन्हयांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक सायबर यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली असून, महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत दिनांक १५/८/२०१६ रोजी राज्यात सर्व जिल्हा पोलीस मुख्यालये व पोलीस आयुक्तालयात एकूण ४७ सायबर लॅब सुरु करण्यात आले असून त्यांना सायबर पोलीस ठाणे असे घोषित करण्यात आले आहे.

राज्यातील संकेतस्थळे, त्याचप्रमाणे शासनाच्या शैक्षणिक, सामाजिक, वाणिज्यिक संस्थांच्या इंटरनेटवरील/ संकेतस्थळावरील अभिलेख सुरक्षित ठेवणे, सायबर गुन्हयांना प्रतिबंध करणे, सायबर जगतातील घटनांवर योग्य तो प्रतिसाद देणे, जनतेमध्ये सायबर गुन्हयांसंदर्भात जनजागृती करणे तसेच पोलीस अधिकाऱ्यांना सायबर गुन्हयांचे प्रशिक्षण देणे इत्यादी बाबी महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी (मुंबई) येथील गिरणी कामगारांच्या घरांबाबत**

**(२३) * २८५२२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरणी कामगारांच्या म्हाडाच्या पहिल्या लॉटरीमध्ये शिवडी येथील कर्मचा-यांना त्यांच्या कुर्ला स्वान मिलच्या जागेमध्ये लॉटरी लागली असताना, यादीमध्ये नाव आले असून लाभधारक कर्मचा-यांना गेली पाच वर्षे घरापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबईतील १८ कापड गिरण्यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या सदनिकांची दिनांक २८/०६/२०१२ रोजी सोडत काढण्यात आली. सदरहू १८ गिरण्यांमध्ये स्वान मिल शिवडी व स्वान मिल कुर्ला या गिरण्यांचादेखील समावेश होता. सदरहू सोडतीमध्ये स्वानमिल शिवडीमधील एकूण ३९५६ अर्जदारांसाठी ३६८ सदनिका उपलब्ध होत्या. तसेच स्वान मिल कुर्लामधील एकूण ३९५६ अर्जदारांसाठी १७० सदनिका उपलब्ध होत्या. शासनाच्या दिनांक ०२/०६/२०१२ रोजी दिलेल्या निर्देशानुसार संबंधित कापड गिरण्यांच्या जागेवरील सदनिकांसाठी त्याच गिरण्यांमधील कामगारांना पात्र समजण्यात यावे. या निर्देशाच्या अनुषंगाने सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या स्वान मिल शिवडी येथील एकूण २२४ गिरणी कामगारांना व स्वान मिल कुर्लामधील एकूण ६० गिरणी कामगारांना माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये सदनिकांचे वितरण करण्यात आलेले आहे.

तथापि, शासनाच्या दिनांक ०२/०६/२०१२ रोजीच्या निर्देशानुसार स्वानमिल शिवडीच्या ज्या गिरणी कामगारांना स्वान मिल कुर्लामध्ये लॉटरी लागली व स्वानमिल कुर्लाच्या ज्या गिरणी कामगारांना स्वान मिल शिवडीमध्ये लॉटरी लागली, अशा एकूण २०८ गिरणी कामगारांना अंतिमत: अपात्र ठरविण्यात आले. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र.३०८६/२०१४ मधील नोटीस ऑफ मोशन ८२/२०१६ व याचिका क्र.३०८३/२०१४ मधील नोटीस ऑफ मोशन ८३/२०१६ दाखल असल्यामुळे अंतिमत: अपात्र ठरविण्यात आलेल्या २०८ गिरणी कामगारांची प्रतिक्षा यादी अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही.

(३) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**मुंबईतील फेरबंदर घोडपदेव येथील न्यू हिंद मिलमधील मैदान समाज केंद्राच्या नावाखाली हडप केले जात असल्याबाबत**

**(२४) * २९२३६ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फेरबंदर घोडपदेव येथील न्यू हिंद मिलमधील सुमारे १५७५ चौरस मीटरचे मैदान समाज केंद्राच्या नावाखाली हडप केले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी येथील नागरिकांनी व काही सामाजिक संघटनांनी त्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फेरबंदर घोडपदेव येथील न्यू हिंद मिलमधील म्हाडाला मिळालेल्या ३१,५०१.२० चौ. मी. भूखंडापैकी, १५७५.०६ चौ. मी. चा भूखंड विकास नियंत्रण नियमावली सन १९९१ मधील तरतुदीनुसार सुविधा भूखंड म्हणून दिनांक ११/०२/२०१४ रोजी म्हाडाकडून महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर भूखंड हा महानगरपालिकेच्या ताब्यात असून, या भूखंडावर महानगरपालिकेमार्फत सुविधा केंद्र इमारत प्रस्तावित आहे.

सदर इमारतीतील प्रस्तावित सुविधा केंद्र इमारत ही कोणत्याही सार्वजनिक संस्थेस चालविण्याकरिता किंवा व्यवस्थापनाकरिता देण्यात येऊ नये तसेच, सदरहू सुविधा केंद्राचे व्यवस्थापन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे या अटीवर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०७/०१/२०१७ रोजी सदर इमारतीच्या आराखडयास मंजुरी दिली आहे. त्यामुळे सदर भूखंड समाज केंद्राच्या नावाखाली हडप केला जात आहे हे खरे नाही.

(२) सदर भूखंड हा खेळाचे मैदान म्हणून राखीव ठेवण्याबाबत तसेच, सदर भूखंडावर सर्व सुविधांसहित मोठे सभागृह, शासकीय शिधावाटप केंद्र, व्यायामशाळा, विविध इनडोअर गेम, वाचनालय, अभ्यासिका, लहान मुलांना शिकवणी व महिलांकरिता उपक्रम अशा विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केली होती ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरालगत असलेल्या अजयपूर रेती घाटावर वाळू तस्करांनी वन विभागाच्या पथकाला मारहाण केल्याबाबत

**(२५) * २९५२० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरालगत असलेल्या अजयपूर रेती घाटावर स्कॉर्पिओतून आलेल्या ७ ते ८ वाळू तस्करांनी दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१७ रोजी रात्रीच्या सुमारास वन विभागाच्या पेट्रोलिंग पथकाला घेरुन मारहाण केली व सहाय्यक वनसंरक्षकाची बंदूक हिसकावून हैदोस करित वन विभागात दहशत निर्माण केल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रसंगामुळे स्थानिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन ९ आरोपीं विरुध्द पो.स्टे.रामनगर, जि. चंद्रपूर येथे अप.क्र.३१५/२०१७ कलम ३९५, ३९७, ३५३, ३३३, ५०६, ३६३, ३४१ भा.दं.वि. सह कलम ७ क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्ट, सह कलम ३ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ९ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगेवाडी (जि.बीड) येथील आश्रमशाळेतील मुलींचे लैंगिक शोषण केल्याबाबत**

**(२६) * २७०७४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नारायण राणे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगेवाडी (जि.बीड) येथील सिंदफणा प्राथमिक आश्रमशाळेत लेक लाडकी या अभियाना दरम्यान निदर्शनास आलेल्या मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणी शिरूर कासार पोलीस स्थानकात एका शिक्षका विरोधात दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास बाल लैंगिक छळविरोधी कायदयांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) व (३) संस्थेच्या सचिवांच्या फिर्यादीवरुन उक्त आश्रम शाळेचे सहशिक्षक यांचे विरुध्द पोलीस ठाणे शिरुर (का) जि.बीड गुरनं.०८/२०१७ कलम ३५४(अ) भादंवि सह कलम ८, १०, १२ बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये दिनांक १४/१/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कल्याण-डोंबिवली शहरातील रस्त्यांच्या सिमेंटीकरण व मजबुतीकरणाच्या कामांमधील अनियमिततेबाबत

**(२७) * २८१९८ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपलिका क्षेत्रात केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीतून चालू असलेल्या रस्ते सिमेंटीकरण आणि मजबुतीकरणाच्या कामात अनियमितता होत असून या रस्त्यांच्या खालून गेलेल्या ड्रेनेज लाईनला प्रॉपर्टी चेंबर न जोडताच कामे केली जात आहेत, अशी तक्रार दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधीने मा.राज्यमंत्री यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिकेच्या गैरकारभारावर टीका झाल्यानंतर सदरहू प्रॉपर्टी चेंबर जोडण्यासाठी बनविलेले रस्ते पुन्हा खोदण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालयातील बैठकीत महानगरपालिका अधिकाऱ्यांसमोर स्थानिक लोकप्रतिनिधीने तक्रार केलेली असताना त्याकडे अधिका-यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सदर महत्वपूर्ण कामाबाबत महानगरपालिका प्रशासनाला जाणीव करून दिल्यानंतर त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून जनतेच्या पैशाचा अपव्यय करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे लेखी निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही,

(२) व (३) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात कल्याण पुर्व येथे पुना लिंक रस्त्यावर जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत मलवाहिनी प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेकडून मुख्य मलवाहिनी व आवश्यकतेनुसार प्रॉपर्टी चेंबर्सचे काम करण्यात येत आहे.

प्रॉपर्टी चेंबर्सचे काम करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचा रस्ता खोदण्यात आलेला नाही. या रस्त्याच्या बाजूस सेवा वाहिन्यांकरीता बनविण्यात आलेला पेव्हर ब्लॉकचा रस्ता काही ठिकाणी खोदण्यात आला. हे काम पुर्ण झाल्यावर सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने नवीन कायद्यांचे प्रारुप तयार करण्यासाठी खाजगी विधी कंपन्यांना मान्यता दिल्याबाबत**

**(२८) * २६८३२ श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नवीन कायद्यांचे प्रारुप तयार करुन घेण्यासाठी तीन खाजगी विधी कंपन्यांना मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह विभागासारख्या अत्यंत महत्वाच्या व संवेदनशील विभागाच्या कायद्यांचे प्रारुप बनविण्याची प्रक्रिया अतिशय गोपनीय असते मात्र, आता लक्ष्मीकुमारन, श्रीधरन व लिंक लीगल इंडिया लॉ सर्व्हिसेस आणि तुली ऍण्ड कंपनी या खाजगी कंपन्यांकडे हे काम दिले जाणार असल्याने शासकीय कामकाजातील गोपनीयतेचा भंग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाचा विधी व न्याय विभाग सक्षम असताना नवीन कायदे, नियम त्यांचे प्रारुप यासारखे महत्वाचे व धोरणात्मक आणि गोपनीय दस्तऐवज बनविण्याची कंत्राटे खाजगी कंपन्यांना देण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्याचे महत्वाचे व धोरणात्मक आणि गोपनीय दस्तऐवज बनविताना गोपनीयता अबाधित राहण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) गृह विभागात अनेक गुंतागुंतीचे व व्यापक कायदेविषयक प्रश्न उद्‌भवतात तसेच नवीन कायदा तयार करणे, अधिसूचना तयार करणे, सेवाप्रवेश नियमात बदल करणे इत्यादी तद्‌नुषंगिक बाबी आपले विहीत कामे सांभाळून वेळेवर पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे त्यांचे मदतीसाठी सदरहू विधी सल्लागार संस्थांच्या सेवांची आवश्यकता विचारात घेऊन या संस्थांना नामिकासूचीवर (Empanelment) घेण्यात आले आहे. सदर सल्लागार संस्था विभागाच्या नियमित कामकाजात सहभागी होणार नसून त्यांना विवक्षित कामे नेमून दिले जातील. सदर विधी सल्लागार संस्था त्यांना दिलेल्या कामासंदर्भात विभागातील संबंधीत अधिकारी व विधी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नेमून दिलेले व नियमानुसार विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन, विहीत पातळीवर निर्णय घेण्यात येतील, तसेच आवश्यकतेनुसार गोपनीयता ठेवली जाईल. त्यामुळे मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेबद्दल प्रश्न उपस्थित होण्याचा किंवा गोपनीयता न पाळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने शाळाबाहय मुलांच्या केलेल्या सर्वेक्षणाबाबत**

**(२९) * २८९९३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी साधारण ४ लाख शाळाबाहय मुले असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले असून याबाबत शिक्षण विभागाने काही दिवसांपूर्वी संशय व्यक्त केला असल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने शहरात केलेल्या सर्वेक्षणात केवळ ४९० मुले शाळाबाहय असल्याचे सांगण्यात आले गतवर्षी केलेल्या सर्वेक्षणात सुमारे २ हजार ९२७ शाळाबाहय मुले आढळून आले, परंतु गतवर्षीच्या तुलनेत हा आकडा फारच कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शाळाबाहय मुलांचा आकडा कमी असून याची दखल घेण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील शाळाबाह्य बालकांचे दिनांक २३ जुलै, २०१६ रोजी एक दिवशीय सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात आढळून आलेल्या २९२७ बालकांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्यात आले आहे. पुनश्च: दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी केलेल्या सर्वेक्षणात आढळलेल्या ४९० बालकांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करुन घेण्यात आले आहे. याची दखल घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मनपा प्राथमिक, मनपा माध्यमिक, खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील कर्मचाऱ्यांमार्फत शाळेच्या परिसरातील रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिग्नल, ब्रिज, फुटपाथ, मॉल्स, रेल्वे जंक्शन, झोपडपट्या गलीच्छवस्ती येथे वास्तव्यास असणारी बालके तसेच डंपिंग ग्राऊंडवर कचरा वेचणारी बालके, इमारत बांधकामाच्या ठिकाणी आढळणारी बालके तसेच शाळेतून गळती झालेल्या ०६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य बालकांचा शोध घेण्याकरीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी एक दिवसीय शोध मोहिम राबविण्यात आली. सदर शोध मोहिमेत आढळून आलेल्या १५६ बालकांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्याचे कार्य सुरु आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वडवली उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * २९२६६ श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ग्रामीण “अ” प्रभाग क्षेत्राला जोडणा-या उल्हास नदीजवळील वडवली रेल्वे फाटकाजवळील उड्डाणपुलाचे काम गेल्या सहा वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलाच्या कामाचे सन २०१० मध्ये भूमिपुजन होऊन रेल्वे प्रशासनाने त्यांचे अखत्यारितील कामे पूर्ण केली असूनही केवळ महापालिका प्रशासनाच्या धोरणामुळे उड्डाणपुलाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्यामुळे स्थानिक नागरिकांना तसेच रुग्णांना फाटक बंद असल्यामुळे अनेक अडचणी येत आहेत, तसेच त्यांचा परिणाम वाहतुकीवर होऊन लोकल व मेल गाडयांना देखील विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) शहाड-आंबिवली स्थानका दरम्यान मोहने वडवली येथे प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलाचे काम मध्य रेल्वेच्या सहकार्याने खर्च विभागणी तत्त्वावर हाती घेण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे नकाशे महानगरपालिकेच्या समंत्रकामार्फत तयार करण्यात आले असून रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीतील काम रेल्वे प्रशासनाकडून पुर्ण करण्यात आले आहे. तर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कामांकरीता महानगरपालिकेकडून कार्यादेश देण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.

या उड्डाणपुलाचे खांब आणि पुलास जोडणाऱ्या पोहोच रस्त्याखालील जमीन खाजगी मालकीची असून संबंधित जमीन मालकांच्या विरोधामुळे भूसंपादनाच्या कामात अडचणी येत आहेत. परिणामी महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कामास विलंब होत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) सदर प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली जमीन हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून संपादित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

या प्रकल्पाच्या भूसंपादनामधील अडचणी त्वरीत दूर करुन सदर प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्याचे निर्देश आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदूरबार नगरपरिषदेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(३१) * २९००७ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार नगरपरिषदेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना प्राधान्याने नोकरीत कायम करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रोजदांरी कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नंदूरबार नगरपरिषदेच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबत व त्याकरीता पद निर्मितीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्याबाबतचा निकाल मा. उच्च न्यायालयाने दिला आहे.
(२) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, नंदूरबार नगरपरिषद व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून शासनास सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३२) * २७३९० ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरात वाढलेले नागरीकरण पाहता जवळपास एक हजार बसेसची आवश्यकता असताना महापालिकेच्या ताफ्यात ४७० बसेस असून त्यातील फक्त १३० बसेस सुस्थितीत असल्याचे व उर्वरित बसेस दुरुस्ती अभावी बंद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेकडो बसेस वारंवार बंद होत असल्याने तसेच बसेससाठी लागणाऱ्या साधन सामुग्री खरेदी प्रक्रियेत होणारे आर्थिक गैरव्यवहार व दुरुस्तीवरील अवाजवी खर्च यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र लेबर एकता युनियनकडून दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिवहन सेवा सुधारावी म्हणून ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी संघटनांनी मा.पंतप्रधान महोदयांकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने पाठविली असून या प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत मा.पंतप्रधान कार्यालयाकडून मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना त्याच सुमारास कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची बातमी स्थानिक वृतपत्रात प्रसिध्दी झाली होती.

(२) होय. अशा स्वरुपाची तक्रार ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

(३) उपलब्ध दस्ताऐवजानुसार अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नसले तरी, उक्त नमुद तक्रारीतील मुद्द्यांबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना ४ आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) सेंट्रल इन्सिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लोकसंख्या विचारात घेता, ठाणे शहरास ७०० बसेसची आवश्यकता आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेकडील ४४५ बसेसपैकी सरासरी २६४ बसेस प्रवासी संचालनाकरीता उपलब्ध आहेत.

या व्यतिरीक्त जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत १९० बसेस मंजुर असून यापैकी ९२ बसेस प्रवासी संचालनाकरीता उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

याशिवाय ठाणे महानगरपालिका क्षेत्रात केवळ महिलांकरीता स्वतंत्र "तेजस्विनी" बसेस उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनामार्फत निधी वितरीत करणे प्रस्तावित आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका तसेच इतर महानगरपालिकांच्या परिवहन सेवेच्या बसेस ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात प्रवाशी संचालन सेवा देतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचणी (जि.पालघर) परिसरातील महावितरणच्या ग्राहकांकडून घेतलेल्या रकमेचा अपहार केल्याबाबत

**(३३) * २८९३२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचणी (जि.पालघर) परिसरातील महावितरणाच्या ९६६ ग्राहकांकडून वीज देयकापोटी घेतलेल्या ११ लाख ३७ हजार ३०६ रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी वाणगाव पोलिसांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑटोमिक्स कंपनीने बोईसर येथेही तीन ठिकाणी वीज देयके वसूल करण्याचे अधिकार नसतानाही ग्राहकांकडून पैसे घेऊन बनावट पावत्या दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित कंपनी व महावितरणचे अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी एकुण ३ गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहे.

१) वाणगांव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०५/२०१७, भा.दं.वि. कलम ४०७, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस मा.जिल्हा सत्र न्यायालय, पालघर यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे व ३ आरोपी फरार असुन त्यांचा शोध सुरु आहे.

२) तारापूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी फरार असून त्या आरोपीतांचा शोध चालु आहे.

३) बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २४४/२०१६ भा.दं.वि. कलम ४०७, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७०, ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून ४ आरोपींना अटक केली आहे व ६ आरोपींचा शोध सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर शहरातील अवैधरित्या सुरु असलेले हुक्का पार्लर बंद करण्याबाबत

**(३४) * २८७३४ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मोठया प्रमाणात हुक्का पार्लर सुरु असून पोलिसांनी धाड टाकून ४ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतल्याचे दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अवैधरित्या सुरु असलेले हुक्का पार्लर बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शहरामध्ये अवैधरित्या हुक्का पार्लर सुरु असल्याबाबत तक्रार किंवा माहिती प्राप्त होताच वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी (मुंबई) येथील क्षयरोग रुग्णालयात क्षयरोगाची लागण झालेल्या कर्मचाऱ्यांना २ वर्षे सुट्टी देणेबाबत**

**(३५) * २८२९५ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २४९१८ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयातील रुग्णांची सेवा करणाऱ्या १७ कामगारांना क्षयरोगाची लागण झाली असून यापैकी ६ जणांना दुसऱ्यांदा या आजाराची बाधा झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये क्षयरोग झालेल्या कर्मचाऱ्यांना ११ महिन्याची पगारी सुट्टी मान्य आहे मात्र येथील कामगारांची २४ महिन्याच्या सुटीची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून क्षयरोगाची बाधा झालेल्या कामगारांना त्यांचे आरोग्य सुधारेपर्यंत २४ महिन्यांची पगारी सुट्टी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे ऑगस्ट, २०१६ वा त्यादरम्यान, शिवडी येथील महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयातील ९ कर्मचाऱ्यांना क्षयरोगाची बाधा झाली असून, त्यापैकी २ कर्मचाऱ्यांना दुसऱ्यांदा क्षयरोगाची बाधा झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्षयरोग रुग्णालय समूह व त्यांच्या अखत्यारीतील विस्तारीत रुग्णालय (बहादुरजी ब्लॉक) व संलग्नीत ५ क्षयरोग चिकित्सालये येथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना क्षयरोगाची बाधा झाल्यास, क्षयरोग रुग्णालयातील वैद्यकीय शास्त्रीय समितीच्या शिफारशीनुसार, रुग्णाच्या क्षयरोगाच्या प्रकारानुसार व उपचार पध्दतीनुसार ३ वर्षांपर्यंत विशेष क्षयरोग रजा देण्यात येते.

तसेच आवश्यक असल्यास महानगरपालिकेच्या रजा नियमानुसार अनुज्ञेय असलेली रजा देखील कर्मचाऱ्यास देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवई तलावाची झालेली दुरवस्था

**(३६) * २९४०३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई तलावात आजुबाजुच्या उदयोग व वसाहतीमधून सांडपाणी तसेच मलजल सोडण्यात येत असल्याने तलावाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावात मलजल सोडणाऱ्या हिरानंदानी वसाहत आणि रेनेसन्स या फाईव्हस्टार हॉटेलवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मलजल वाहिन्या सोडण्याबाबत संबंधित विभागाकडून परवानगी घेण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पवई तलावात आजुबाजुच्या उदयोग व वसाहतीमधून सांडपाणी तसेच मलजल सोडण्यात येते हे खरे नाही.

तथापि, पवई तलावाच्या आजुबाजूच्या परिसरातील काही वसाहतीतील सांडपाणी अनधिकृतपणे पर्जन्य जलवाहिनीला जोडले असल्याने काही प्रमाणात मलजल पवई तलावात येते ही वस्तुस्थिती आहे.

(२) हिरानंदानी वसाहतीतील सांडपाण्याचा निचरा तेथील मलनि:सारण वाहिनीत होतो.

हॉटेल रेनेसन्स येथे सांडपाण्याच्या शुध्दीकरणासाठी सांडपाणी संयंत्र केंद्र उभारण्यात आले आहे.

त्यामुळे हिरानंदानी वसाहत व हॉटेल रेनेसन्स यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर परिसरातील सांडपाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

- पवई मलजल उदंचन केंद्र ते लाल बहादूर शास्त्री मार्गावरील गांधीनगर जंक्शनपर्यंत मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- सदर मलनि:सारण वाहिनी कार्यान्वित झाल्यानंतर पवई येथील सर्व मलप्रवाह लाल बहादूर शास्त्री मार्गावरील १००० मि.मी. व्यासाच्या गुरुत्व मलनि:सारण वाहिनीद्वारे प्रवाहित होणार आहे.
- तसेच, पवई तलाव परिसरातील इमारतीत सांडपाणी संयंत्र केंद्रे उभारली आहेत किंवा नाहीत, तसेच ती योग्य रीतीने कार्यरत आहेत का हे तपासून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिनांक ०७/०९/२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.

(३) पवई तलावात मलजल सोडण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. (पुणे) च्या संचालकांनी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार केल्याबाबत**

**(३७) * २६९३५ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. च्या संचालकांनी कर्मचाऱ्यांच्या रुपये ४२ लाखाच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने भारतीय दंड संहिता नियम ४०६ अंतर्गत दिनांक १०/०१/२०१७ रोजी डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे येथे मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. या आस्थापनेतील संचालकांच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल करुन त्यांच्याविरुध्द भविष्य निर्वाह निधीच्या रुपये ४२,३९,००२/- इतक्या रकमेच्या अपहाराबाबत फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिकेने भूमिगत खोदकामासाठी जादा खर्च केल्याबाबत**

**(३८) * २९३३३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने विकास कामाचे कोणत्याही प्रकारे योग्य नियोजन केले नसल्याने भूमिगत खोदकामासाठी महापालिकेला तीन कोटी रुपयांचा जादा खर्च लागला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता विकास कामे करणाऱ्या दोषी अधिकारी-कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत शहरातील भुमिगत गटार योजनेच्या कामासाठी काढण्यात आलेल्या निविदेतील अटींनुसार खोदकाम करताना परिमाणामध्ये परिस्थितीनुसार बदल झाला तरी, प्रकल्पातील खोदकामाकरीता कोणत्याही प्रकारचा जादा खर्च करावा लागणार नसून मंजूर प्रकल्प किंमतीच्या मर्यादेतच याबाबतचा खर्च भागविण्याची तरतूद आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील मेट्रो प्रकल्पाबाबत

**(३९) * २७९८३ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २४३५० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर वाहतूक विषयक सर्वंकष अभ्यास करून मेट्रोसंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश शासनाने नाशिक महानगरपालिकेस दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार नाशिक शहरातील मेट्रो प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाशिक महानगरपालिकेने शहर वाहतूक विषयक सर्वंकष अभ्यास करुन वाहतूक आराखडा तयार करण्यासाठी मेसर्स अर्बन मास ट्रान्झीट कंपनी लिमिटेड या सल्लागाराची नेमणूक केलेली असून सद्यस्थितीत नाशिक महानगरपालिकेच्या स्तरावर वाहतूक आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला (मुंबई) येथील कपाडियानगर झोपडपट्टीस लागलेली आग

**(४०) * २७६७२ श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) येथील कपाडियानगर झोपडपट्टीस आग लागून ८ झोपड्या जळाल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर आगीत झोपड्या जळून बेघर झालेल्या झोपडीधारकांना तात्पुरती आर्थिक मदत व पुनर्वसन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०७/०१/२०१७ रोजी वाकोला पोलीस ठाणे हद्दीतील कालीना, सांताक्रुज (पुर्व) येथील कुरय्या इस्टेट मधील चार गाळयांना आग लागून त्यातील काही सामान जळाले आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही.

या आगीसंबंधात कोणीही संशय घेतलेला नाही तसेच तक्रार प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी पोलीस ठाण्यात दैनंदिनी क्रमांक २३/१७, दिनांक ०७/०१/२०१७ अन्वये नोंद घेण्यांत आलेली आहे.

सदरच्या गाळयांना शॉट सर्किटमुळे आग लागली आहे. सदर गाळे वाणिज्य वापरात असल्याने आणि सदर घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने मदत देण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपरिषदांमधील शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(४१) * २९५६२ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांना सन १९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणी (काल्पनिक) लागू करण्यास शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने त्यांना सदर वेतनश्रेणीचा लाभ देण्याची मागणी अमरावती विभाग शिक्षक आघाडीने निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदांमधील कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक २६/२/२०१४ अन्वये राज्यातील सर्व उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दिनांक १/१/१९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (पश्चिम) येथील महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर विकासकाने दोन इमारती उभारल्याबाबत**

**(४२) * २७९३९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पश्चिम) रेल्वे स्थानकापासून तीन ते चार मिनिटांच्या अंतरावर असलेला सीटी सर्व्हे नंबर ३३८८, २४३ हा भूखंड वाचनालयासाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत असताना त्या जागेवर विकासकाने दोन इमारती उभारल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचे आश्वासन देऊन त्या मोबदल्यात मिळवलेला टीडीआर (हस्तांतरणीय विकास हक्क) बांधकामासाठी वापरणाऱ्या विकासकाने याच वाचनालयाच्या जागेवर दोन इमारती उभारून तोच टीडीआर पुन्हा वापरण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरक्षित जमिनीवर ६७५.६३ चौ.मी. क्षेत्रफळाचे वाचनालय, १२०० चौ.मी. बगीचा, ४४४१ चौ.मी.ची प्राथमिक शाळा आणि १०७६ चौ.मी. जागा रस्ता व नाल्यासाठी वापरण्याचे नियोजन असतानाही विकासकाने उपरोक्त सर्व आरक्षण महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्यामुळे त्या एकूण आरक्षित जागेच्या मोबदल्यात विकासकाला टीडीआर देखील देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विकासकाने सदर टीडीआरचा वापर विना आरक्षित जागेवरील बांधकामात केला असून एकाच जागेच्या टीडीआर चा दोनदा वापर केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार यात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे कल्याण येथील सर्व्हे नंबर २४३, सीटी सर्व्हे नंबर ३३८८ या भूखंडावर विकास योजना रस्ता, वाचनालय, बगीचा, प्राथमिक शाळा, असे विकास प्रस्ताव असून उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागात आहे. सदर वाचनालय या आरक्षणाचा विकास मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमधील समावेशक आरक्षणाचे माध्यमातून करण्यात आला आहे. वाचनालय आरक्षणाचा कोणताही मोबदला अथवा हस्तांतरणीय विकास हक्क महानगरपालिकेने दिलेला नाही.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक १९/१/२००६ रोजी मंजूर केलेल्या विकास परवानगीमध्ये अर्जदाराने विकास योजना रस्त्याने बाधीत ४४४१.६४ चौ.मी. क्षेत्रापैकी ३३१२.७६ चौ.मी क्षेत्र चटई क्षेत्र स्वरुपात (डीआर) व आरक्षणाचे (आ.क्र.१३२ प्राथमिक शाळा) क्षेत्र २०४.०० चौ.मी., आ.क्र.१३३ वाचनालय (क्षेत्र ६७५.६३ चौ.मी.), आ.क्र.१३४-बगीचा (१२०७.५० चौ.मी.) आणि प्रस्तावित नाल्याने बाधीत १०७६.८८ चौ.मी. असे ३१६४.०१ चौ.मी. असे मिळून एकूण ६४७०.५० चौ.मी. क्षेत्र, चटई क्षेत्र स्वरुपात (DR) बांधकाम क्षेत्र प्रस्तावित केले होते.

(४) अशी बाब निदर्शनास येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यांच्या कामांतील गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(४३) * २७४५१ श्री.शरद रणपिसे, श्री.नारायण राणे, श्री.जयंत पाटील, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यांच्या कामांमध्ये सुमारे रुपये ३५० कोटीचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या फेरीचा अहवाल सादर केलेला असून त्यात रस्त्यांच्या कामात अनियमितता होऊन सुमारे रुपये ३५२ कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी अहवालात कोण-कोणत्या बाबी स्पष्ट झालेल्या आहेत व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्ते दुरुस्तीच्या कामांमध्ये सुमारे रुपये ३५० कोटी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी सुरु करण्यात आलेल्या चौकशीचा अंतरिम अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

(२) सदर चौकशी अहवालामध्ये खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत :-

- ३४ रस्त्यांच्या कामाची तांत्रिक तपासणी केली असता रस्त्याच्या पी.क्यू.सी. लेअरच्या खाली ड्रेन लेअरच्या कामाची बील ऑफ क्वाँटीटी प्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. याचे परिमाण (क्वाँटीटी) २० ते १०० टक्क्यांनी कमी आढळून आले.
- बील ऑफ क्वाँटीटीप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नसतांनाही त्रयस्थ लेखापरिक्षक यांनी कामे प्रमाणित केलेली आहेत.
- अहवालानुसार महानगरपालिकेचे रुपये १४.४१ कोटी इतके नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- सदर कामांची अंमलबजावणी करणारे अधिकारी यांना अनियमितता/ गैरव्यवहाराची माहिती असतांनाही रस्ते दुरुस्तीच्या कामात अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

  सदर प्रकरणी करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे :-

  - सदर प्रकरणात दोषी आढळलेल्या संबंधित ६ कंत्राटदार व २ लेखापरिक्षक यांच्यावर प्रथम खबर अहवाल (एफ.आय.आर) दाखल करण्यात आले आहेत. तसेच त्यांना कारणे दाखवा नोटीसा बजाविण्यात येऊन काळया यादीत टाकण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
  - संबंधित कर्मचाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
  - तत्कालीन प्रमुख अभियंता (रस्ते) यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे तर तत्कालीन प्रमुख अभियंता (दक्षता) यांना अन्य प्रकरणी निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात नगरोत्थान योजनेतील रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) * २९७९२ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात नगरोत्थान योजनेतून सबवर्कची ४३ कामे मंजूर झाली असून १० कामांपैकी ३ रस्ते निविदा प्रक्रियेत अडकले असून ७ रस्त्यांची कामे जागा भूसंपादन न झाल्याने प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याने जागेची भरपाई देण्यासाठी महानगरपालिकेकडे पैसे नसल्याने टीडीएस घ्या अन जागा मोकळी करा असा प्रस्ताव महापालिकेने शेतकऱ्यांसमोर ठेवला आहे, परंतु हद्दवाढ व टीडीएसचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा होणार नसल्याने भूसंपादन करण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन भूसंपादना अभावी प्रलंबित असलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत (राज्यस्तर) सोलापूर जिल्हयातील सोलापूर शहराच्या रुपये १८७.७७ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास मान्यता दिली आहे.

- सदर योजनेंतर्गत शहरातील ३२ रस्ते कामांचा समावेश आहे.
- सदर ३२ रस्त्यांपैकी २१ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
- उर्वरीत रस्त्यांपैकी ३ रस्त्यांची कामे निविदाधीन असून ०८ रस्त्यांची कामे भुसंपादना अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सोलापूर महानगरपालिकेमार्फत सदर ०८ रस्त्यांच्या जागा भूसंपादनाकामी जागेच्या मिळकतदाराना एकत्रितरित्या बोलावून टी.डी.आर. घेणे बाबत संबंधितांना अवगत केले आहे.

तथापि, शेतकरी व जागा मिळकतदार यांचेकडून टी.डी.आर. घेणेबाबत उदासीनता दिसून येत आहे.

त्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (राज्यस्तर) मधील भूसंपादनाअभावी शिल्लक राहिलेली कामे रद्द करावी किंवा कसे ? याबाबत सोलापूर महानगरपालिका प्रशासनामार्फत सर्वसाधारण सभेपुढे विशेष प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

-----------------

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत**

**(४५) * २६८९८ श्री.संजय दत्त, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील गुन्हेगारीचा वाढता आलेख, वाढते औद्योगिकरण व नागरिकीकरण तसेच या परिसरातील आयटी कंपन्यामध्ये काम करणा-या महिला व मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत असल्याने शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केला होता. तथापि पिंपरी-चिंचवड, पुणे येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरीय रेल्वे लाईन (ट्रॅक) लगत सांडपाण्यावर पालेभाज्या पिकवल्या जात असल्याबाबत

**(४६) * २६८०० श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरीय रेल्वे लाईन (ट्रॅक) लगत असलेल्या नाल्यातील सांडपाण्यावर पालेभाज्या पिकवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पालेभाज्या आरोग्यास अपायकारक व घातक असून त्यामुळे पोटाचे विकार तसेच कॅन्सर, डायबेटीज इत्यादी गंभीर आजार होत असल्याने आरोग्याच्या गंभीर समस्या उद्‌भवत असल्याचे केलेल्या पाहणीच्या निष्कर्षातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबईमध्ये पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे व हार्बर रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूस असलेल्या रेल्वेच्या मालकीच्या मोकळया जागेत अनेक ठिकाणी रेल्वे प्रशासनाकडून सदर भागात अतिक्रमण होऊ नये याद‍ृष्टीने रेल्वेच्या इच्छुक कर्मचाऱ्यांना काही शुल्क आकारुन भाजीपाल्याची लागवड करण्याची परवानगी अनेक वर्षांपासून देण्यात येते.

अशा पध्दतीने भाजीपाल्याची लागवड करतांना निकटवर्ती वाहणाऱ्या नाल्याचे पाणी वापरले जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापि, वरीलप्रमाणे मुंबईमध्ये रेल्वेमार्गाच्या दुतर्फा लागवड करण्यात येणाऱ्या पालेभाज्यांमुळे कॅन्सर, डायबेटीज वा अन्य विविध आजारांचा प्रादुर्भाव होत असल्याचा ठोस पुरावा देणारा कोणताही शास्त्रीय अभ्यास समोर आलेला नाही वा अशा स्वरुपाची तक्रारही यापूर्वी महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

तथापि, भाजीपाला लागवडीस स्वच्छ पाणी वापरले जाईल याची खबरदारी घेऊनच अशी परवानगी देण्यात यावी अशा सूचना रेल्वे प्रशासनास देण्यात आल्या आहेत.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे पाच वर्षीय मुलीवर दोन अल्पवयीन मुलांनी अत्याचार केल्याबाबत**

**(४७) * २७०९८ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे पाच वर्षीय मुलीवर दोन अल्पवयीन मुलांनी अत्याचार केल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) सदर प्रकरणी भोईवाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. I ०१/२०१७ भादंवि कलम ३७६, ३४ सह पोक्सो कायदा कलम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना दिनांक २/१/२०१६ रोजी ताब्यात घेऊन बाल न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना जामिनावर मुक्त केले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपाडा (मुंबई) येथून मुलीचे अपहरण करुन हत्या करण्यात आल्याबाबत**

**(४८) * २८३२७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा (मुंबई) येथून अपहरण करुन हत्या करण्यात आलेल्या साडेतीन वर्षाच्या मुलीच्या प्रकरणात नवनवीन खुलासे होत असून या मुलीला बेशुध्द करण्यासाठी अल्पवयीन बालकांनी महाविद्यालयाच्या लॅबमधून क्लोरोफार्मची चोरी केली असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपहरण प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी दोन्ही अल्पवयीन बालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.नों.क्र.२२८/२०१६ कलम ३०२, ३८५, २०१, ३६३, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील सहभाग असलेल्या दोनही विधीसंघर्षग्रस्त बालकांना दिनांक २५/१२/२०१६ ताब्यात घेण्यात आले असून, सध्या बाल निरीक्षण गृह, डोंगरी, मुंबई येथे ठेवण्यात आलेले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४९) * २७८४२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २३५७९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागात झालेल्या ३.५१ लक्ष रूपयांच्या आर्थिक अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान चौकशी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या कलम १३ प्रमाणे दोषी असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, यंत्रणा, कंत्राटदार यांच्याविरूध्द महासंचालकांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे छाननीअंती, नमूद तक्रारी प्रशासकीय स्वरुपाच्या असल्याने निदर्शनास आल्याने सदर तक्रार अर्ज पुढील चौकशीसाठी संबंधित प्रशासकीय विभागाकडे पाठविला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पवई तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण करण्याबाबत

**(५०) * २८१४१ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील तलावात सन २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मासेमारी व पिकनिक बोटींना बंदी घालण्यात आली असुनही दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास हाऊसबोट उलटून तीन जणांचा मृत्यू झाल्याने तेथील तलावाच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १७८९ मध्ये मिठी नदीवर बांधण्यात आलेल्या पवई तलावाचा सन १९९५ मध्ये केंद्रीय वन व पर्यावरण विभागाने राष्ट्रीय तलाव संवर्धन योजनेत १० तलावांच्या यादीत समावेश केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहराच्या पर्यटनास चालना देण्यासाठी सदरहू तलावाचे संवर्धन, सुशोभिकरण व बोटींगला परवानगी देवून पर्यटन स्थळ निर्माण करणे व त्याचे अस्तित्व कायम टिकविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पवई तलाव येथे दिनांक २३/१२/२०१६ रोजी अनधिकृत हाऊस बोट उलटून ८ व्यक्ती पाण्यात पडल्या, त्यापैकी ५ व्यक्तींना वाचविण्यात आले व ३ व्यक्तींचा बुडून मृत्यू झाला हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पवई तलाव पुनर्जीवित करण्याकरिता कायमस्वरुपी योजना विकसित करणे आणि पवई तलावाचे सुशोभिकरण करण्याचे काम करण्यासाठी महानगरपालिकेने ऑक्टोबर, २०१६ मध्ये सल्लागाराची नेमणूक केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्याकांडाच्या तपासाबाबत**

**(५१) * २६९२५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २३७११ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्याकांडाच्या तपासाबाबत स्कॉटलंड यार्डच्या न्याय वैद्यक प्रयोग शाळेचे भारत आणि यू.के.मध्ये माहितीची देवाणघेवाण करण्याबाबत कायदेशीर करार झाला नसल्याचे सी.बी.आय.कडून सांगण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही हत्याकांडाच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षात काहीच प्रगती न झाल्याने शासनाकडून तपास कार्यासाठी काही वेगळया प्रकारची भूमिका घेण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचा संदर्भात डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५४/२०१३, भादंवि कलम ३०२,३४ शस्त्र अधिनियम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास दिनांक ०३/०६/२०१४ रोजी कॆंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हयातील राजारामपुरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३९/२०१५ भादंवि कलम ३०२,३०७,१२०(ब), ३४ सह आर्म ॲक्ट ३(१)/२५ (१ब) (अ), ५(२७) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयातील दोन आरोपींना अटक करून त्यांच्याविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सी.आर.पी.सी. १७३(८) प्रमाणे चालू आहे तसेच उर्वरित दोन आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अग्निशमन दलास अद्‌यावत साधन सामुग्री पुरविण्याबाबत

**(५२) * २७६०९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अग्निशमन दलाचे जवान कालबाह्य साधन सामुग्री वापरत असल्यामुळे असुरक्षित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवानांना दिलेली जॅकेट, ट्राऊजर्स, बेल्ट, टी-शर्ट, बूट, कुऱ्हाड इत्यादी सामुग्रीची मुदत सन २०१३ मध्येच संपली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अग्निशमन दलामध्ये एकूण ३०१० जवानांची आवश्यकता असताना त्यातील ८८३ जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अग्निशमन दलास अद्‌यावत साधन सामुग्री पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

आंतरराष्ट्रीय मानकानुसार या उपकरणांसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. सदर साधने सुस्थितीत असल्याने आजही वापरात आहेत. त्यामुळे उपकरणे कालबाह्य झाल्यामुळे जवानांना अडचणींना सामोरे जावे लागते हे खरे नाही.

तथापि, सततच्या वापरामुळे काही उपकरणे वापरायोग्य नसल्याचे आढळल्यास ती तात्काळ बदली करण्यात येतात.

(३) मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवर एकूण ४१९७ पदे आहेत, त्यापैकी २६८७ पदे भरण्यात आली असून १५१० पदे रिक्त आहेत.

(४) व (५) मुंबई अग्निशमन दलातील जवानांकरीता सन २०१६-१७ करीता अदययावत स्व:संरक्षण उपकरण संच (पी.पी.ई.) खरेदीची प्रक्रिया अंतिम टप्प्यावर आहे. या उपकरणांचे नमुने आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरीता पाठविण्यात आलेले असून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारास पुरवठा आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात येतील.

-----------------

**बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी कमी खर्च झाल्याबाबत**

**(५३) * २७३०१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी बांधकाम उपकरातून जमा झालेल्या ३७९९ कोटी रुपयांपैकी फक्त २१७ कोटी रुपये कमी नोंदविलेल्या ३.३५ लाख बांधकाम कामगारावर खर्च झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी नोंदविण्यात आलेले बांधकाम कामगार आणि त्यावरील अतिशय कमी झालेला खर्च याची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

मंडळाकडे उपकरा अंतर्गत माहे जानेवारी, २०१७ अखेर जमा झालेल्या रुपये ४,८८४ कोटी रुपयांपैकी सुमारे रुपये २५२ कोटी इतकी रक्कम मंडळाकडील नोंदीत ५.८५ लक्ष बांधकाम कामगारांपैकी ४.२९ लक्ष पात्र बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्याकरिता खर्च करण्यात आलेली आहे.

(२) बांधकाम कामगार म्हणून नोंदणीसाठी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र असणे कायद्याने बंधनकारक आहे.

बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्याकरिता शासनाने दिनांक १३/८/२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांना दिले असून बांधकाम कामगारांची बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन नोंदणी करण्याकरिता बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत माहिती तंत्रज्ञानावर आधारीत प्रणाली विकसित करण्यात येत आहे. तसेच व्यापक जनजागृती मोहीम राबविणे कल्याणकारी योजना मंजूर करणे, व पायाभूत सुविधा मंडळास उपलब्ध करुन देणे या उपाययोजना मंडळामार्फत करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या भूखंडावरील इमारतीचा पुनर्विकास करण्याकरिता अधिसूचना काढल्याबाबत

**(५४) * २६९९० श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नारायण राणे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या भूखंडावरील इमारतीचा पुनर्विकास करण्याकरिता विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) मध्ये दुरुस्ती करण्याची अधिसुचना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आली आहे, हे खेरे आहे काय,

(२) असल्यास, या दुरुस्ती अन्वये २००० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडाचा विकास करताना हौसिंग स्टॉक ऐवजी प्रिमियम घेण्याची सवलत विकासकास देण्यात आली आहे, यामुळे म्हाडाकडून स्वस्तात घरे मिळणार नसल्याने सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पुर्ण होणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सर्वसामान्यांना स्वस्तात घरे मिळण्याच्या दृष्टीने सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.

प्रारुप अधिसूचना हरकतींसाठी दिनांक ०५/०१/२०१७ रोजी प्रसिध्द झालेली आहे. परंतु अंतिम अधिसूचना अद्याप पर्यंत प्रसिध्द झालेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या अहवालानुसार २०००.०० चौ. मी. पर्यंतच्या भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास म्हाडास हौसिंग स्टॉक दिल्याने वर्धनक्षम होत नसल्याने रखडत असल्याचे सहकारी संस्था, वास्तुशास्त्रज्ञ, लोकप्रतिनिधीनी वारंवार निदर्शनास आणल्याने जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवाश्यांचे पुनर्वसनाचे काम होण्याच्या दृष्टीने, या संस्थांना अधिमुल्यावर आधारित पुनर्विकासाला परवानगी देणे व त्याचवेळी २०००.०० चौ. मी. पेक्षा अधिकच्या भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास म्हाडास हौसिंग स्टॉक देण्याच्या तत्त्वावर तर ४०००.०० चौ. मी. पेक्षा अधिकच्या भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास ४.०० च.क्षे.नि. पैकी म्हाडास १.०० च.क्षे.नि. नूसार हौसिंग स्टॉक देण्याच्या तत्वावर प्रस्तावित केलेला आहे. तसेच म्हाडास

हौसिंग स्टॉक मिळण्याबरोबरच छोट्या भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास वर्धनक्षम होण्यासाठी सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. म्हाडास मिळणाऱ्या अधिमुल्यापैकी ५०% अधिमुल्य निवारा निधीमध्ये वर्ग करण्याचे प्रस्तावित असून या निवारा निधी मधून सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे उपलब्ध होऊ शकतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी (मुंबई) येथील क्षयरोग रुग्णालयातील रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत**

**(५५) * २८९५६ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी (मुंबई) येथील क्षयरोग रुग्णालयात रोजंदारीवर काम करणाऱ्या ४९ सफाई कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या जागी महापालिका प्रशासनाने खाजगी कंत्राटदाराद्वारे कर्मचारी भरती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात क्षयरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी संपूर्ण रुग्णालयाची स्वच्छता, साफसफाई व देखभाल करण्याच्या कामासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आल्यामुळे सदर ४९ रोजंदारी सफाई कामगारांना कमी करण्यात आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

सदर कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारी तत्वावर कार्यरत असल्याने त्याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.

सदर कामगारांना महानगरपालिकेच्या इतर खात्यांमध्ये/रुग्णालयात सामावून घेण्याची शक्यता पडताळून पाहण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील मोनो रेल्वे फेझ-२ च्या कामास सुरुवात करणेबाबत

**(५६) * २८५८४ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोनो रेल्वे फेझ-२ वडाळा ते किंगसर्कल या मार्गातील कामांची सुरुवात करण्याची तारीख सतत पुढे ढकली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामाची सुरुवात करण्यास होत असलेल्या दिरंगाईची कारणे काय आहेत तसेच या कामाला दिरंगाई करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामाची सुरुवात कधी करण्यात येणार आहे व मोनो रेल्वे फेझ-२ मध्ये येणा-या अडचणी दूर करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबई मोनोरेल प्रकल्प भारतातील पहिला प्रकल्प असून मोनोरेलची मार्गिका दाट लोकवस्तीतून जात असून या प्रकल्पाचे काम सुरु असताना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला आहे. सदर प्रकल्प राबविताना अकस्मात येणाऱ्या जागेसंदर्भातील व तांत्रिक कारणास्तव तसेच सदर प्रकल्पाने बाधित कुटुंबांचे पुनर्वसन इत्यादी प्रश्न निकाली काढावे लागल्याने फेज-२ पूर्ण करण्यास वेळ झाला आहे. टप्पा-२ संत गाडगे महाराज चौक ते वडाळा या मार्गिकेचे स्थापत्य काम अंदाजे ९८% पूर्ण झाले असून वडाळा रोड आणि करी रोड येथे रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या पूलाचे बांधकाम पूर्णत्वास आले आहे. सिग्नलींग व कम्युनिकेशनची कामे प्रगतीपथावर असून पुढील ६ महिन्यामध्ये टप्पा २ हा प्रवाशांकरीता खुला करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रयत्न सुरु आहेत.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने सिध्दार्थनगर, गोरेगाव (प) येथील आरक्षित खुले मैदान विकासकाला दिल्याबाबत**

**(५७) * २८५४२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने गोरेगाव (प) सिध्दार्थनगर, बेस्ट नगर समोरील व मोतीलाल नगर येथील सर्व्हे नं. २३ ए व २४ ए हे आरक्षित खुले मैदान विकासकाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

सिध्दार्थनगर ले-आऊट गोरेगाव पश्चिम मध्ये मंजुर पुनर्रचित विकास नियोजन आराखडा ११९१ प्रमाणे नवे न. भू. क्र. २२/अ/९ व २२/अ/१० [जुने न.भू.क्र. २३ (भाग) व २४ (भाग)], मौजे गोरेगाव हे भुखंड उद्यानासाठी आरक्षित असून सदर जमीन म्हाडा प्राधिकरणाच्या मालकीची आहे. सदर मैदानाची जागा मंजूर भू-अभिन्यासामध्ये इतरत्र स्थलांतरीत करुन नियमानुसार राखीव ठेवण्यात आले आहे. संपूर्ण योजनेतील जमिनीची मालकी म्हाडाची असल्याने सदरहू उद्यान/खुले मैदान विकासकास देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोटे औद्योगिक वसाहत (जि.रत्नागिरी) येथील योजना कंपनीत झालेल्या वायुगळतीत कामगार गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(५८) * २७०६९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे औद्योगिक वसाहत (जि.रत्नागिरी) येथील योजना कंपनीतून दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास ओलियम वायूची गळती झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वायू गळतीची बाधा किती कामगारांना झाली आहे व किती कामगार गंभीर जखमी झाले आहेत,

(३) असल्यास, बाधितांना कोणती वैद्यकीय मदत केली वा करण्यात येत आहे तसेच यास दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

सदर कारखान्यात रंगकाम करणाऱ्या एका कामगाराने ओलियम टाकीच्या पाईपवर पाय दिल्यामुळे कामगाराच्या वजनामुळे पाईप ओलियम टाकीच्या व्हॉल्वमधून तुटला. त्यामुळे ओलियमच्या वाफा पसरल्या.
(२) ओलियमच्या वाफांमुळे रंगकाम करणा-या २ कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या तसेच कारखान्याबाहेरील २ महिलांना ओलियमची किरकोळ बाधा झाली.
(३) सर्व बाधितांच्या वैद्यकीय उपचारांवरील खर्च रु.३,००,०००/- कारखान्याच्या व्यवस्थापनाने केला आहे.

सदर घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कोल्हापुर या विभागाने केली असुन कारखान्याचे भोगवटादार यांच्याविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७-A(२)(a) व ७-A(२)(c) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या ११४ च्या Schedule XII चा Clause ५ च्या भंगाबाबत एक फौजदारी खटला मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल करण्यात येत आहे.

तसेच खेड पोलीस यांनी भोगवटादार, मॅनेजर व सुपरवायझर यांचेविरुध्द आयपीसी चे कलम २७८, २८५, २८६, ३३७ आणि ३४ या अंतर्गत रजि. नं. ११/२०१७, दिनांक १४/०१/२०१७ रोजी गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली एम.आय.डी.सी. क्षेत्रातील प्रोबेस कंपनीत झालेल्या स्फोटातील बाधितांना भरपाई देण्याबाबत

**(५९) * २८२३० श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४४ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) एम.आय.डी.सी. क्षेत्रातील प्रोबेस कंपनीत दिनांक २६ मे, २०१६ रोजी दुपारी ११.३० च्या दरम्यान झालेल्या भीषण स्फोटात १२ जणांचा मृत्यू, १८० पेक्षा अधिक नागरिक जखमी तर सुमारे २७०० घरांचे नुकसान होऊन शेकडो वाहनांचेही नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्फोटाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी केल्यावर त्याची भीषणता पाहून मा.मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून सदरहू स्फोटाची कारणे शोधून त्याबाबतचा अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, या अहवालात स्फोटाचे निश्चित कोणते कारण आढळून आले आहे,

(४) तसेच, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या स्फोटातील बाधितांना भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २६/०५/२०१६ रोजी डोंबिवली येथील प्रोबेस एंटरप्रायझेस या कारखान्यात झालेल्या स्फोटामध्ये एकुण १२ व्यक्तींचा मृत्यू झाला असुन २१५ व्यक्ती जखमी झाले आहेत व परिसरातील अंदाजे २६६० घरांचे व संस्थांचे नुकसान झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) समितीचा अहवाल अद्‌याप शासनास प्राप्त झालेला नाही. या संदर्भात शासन स्तरावरुन सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) या दुर्घटनेत मयत झालेल्या १२ व्यक्तींच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहायता निधीतून रुपये २४,००,०००/- आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात आले होते. त्यापैकी ९ व्यक्तींच्या वारसांना (दुर्घटनेस जबाबदार असलेल्या तीन मृतांच्या वारसांना वगळून) प्रत्येकी रुपये २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करण्यात आले आहे. ५ कामगारांच्या वारसांना वाटप करावयाची नुकसान भरपाईची रक्कम रुपये २९,६५,९६०/- आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई ठाणे यांच्याकडे कारखान्याच्या व्यवस्थापनातर्फे जमा करण्यात आली आहे. तसेच ५ मृत कामगारांच्या वारसांना, कारखाना व्यवस्थापनाने एकुण रुपये ७,५०,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे. राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणी असलेल्या २ कामगारांच्या वारसांना त्या कार्यालयातर्फे पेन्शन मंजुर आहे.

जखमी व्यक्तींच्या उपचार खर्चासाठी रुपये २६,५१,९१०/- मंजुर झाले होते. त्यापैकी रुपये २३,४५,८५८/- अदा करण्यात आलेले आहेत. शिल्लक रुपये ३,०६,०५२/- पैकी रुपये १,११,६२२/- हे मेडीक्लेमद्वारे भरले असल्यामुळे व रुपये १,४९,४३१/- हे जखमी व्यक्तींच्या आस्थापनामार्फत अदा करण्यात आली आहे.

सदर परिसरामधील इमारती इत्यादींच्या नुकसानीबाबत एकुण २६६० पंचनाम्यामध्ये नमुद रक्कम रुपये ७,४३,२७,९९०/- एवढया रकमेबाबत मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधुन आर्थिक सहाय्य मिळणेबाबतचा प्रस्ताव तहसिलदार कार्यालयाने सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील वाढत्या आगीच्या घटना रोखण्याबाबत

**(६०) * २६८३३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात अनेक चाळी व जुन्या इमारतीतील विद्युत जोडण्या दाटीवाटीने टाकण्यात आल्या असून यातील ९० टक्के पेक्षा जास्त विद्युत वाहिन्या ४० ते ५० वर्षे जुन्या असल्याने शॉटसर्कीटमुळे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सर्वाधिक ५५० दुर्घटना घडल्याचे मुंबई अग्निशमन दलाने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहरातील वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) शहरातील वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दल तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- मुंबई शहर व उपनगर जिल्हे यांमध्ये विद्युत जोडण्यांशी संबंधित असलेल्या बेस्ट, रिलायन्स, टाटा व एम. एस. ई. बी. यांना इलेक्ट्रीसिटी ॲक्टप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेने दिनांक ०३/११/२०१६ रोजी सुचित केले आहे.

- मुंबई अग्निशमन दलाने "अग्निशमन स्वयंसेवक" या उपक्रमाद्वारे शहरातील नागरिकांना, दुर्घटनेच्या वेळी मदत मिळण्यासाठी इमारतीची अग्निशमन यंत्रणा, उपाययोजना तसेच, अग्निशमनाचे विविध प्रकार, आग विझविण्याच्या उपाययोजना इत्यादीबाबत आतापर्यंत ६००० पेक्षा जास्त नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- मुंबई अग्निशमन दलामार्फत, शाळा, महाविद्यालये, रहिवाशी इमारती व संकुले तसेच कार्यालये व औद्योगिक व्यवस्थापनांमध्ये प्रत्यक्ष आगीची दुर्घटना घडल्यास अग्निशमन दल पोहचण्यापूर्वी करावयाच्या उपाययोजना तसेच प्रत्यक्ष आग विझविण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबतची माहिती दिली जाते.
- ज्या घरांच्या अंतर्गत वायरींग जुन्या झालेल्या आहेत त्या त्यांनी दुरुस्त करुन घेण्याबाबत जनजागृती मोहिम महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातर्फे हाती घेण्यात येत असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बदलापूर (जि.ठाणे) येथील एका दाम्पत्याने व्यवसाय प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली महिला व तरूणींची फसवणूक केल्याबाबत**

**(६१) * २९२९७ श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील एका दाम्पत्याने शासनाच्या प्राप्त प्रशिक्षण केंद्राच्या योजनेचा फायदा घेऊन सुमारे १५० महिला व तरूणींची व्यवसाय प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली लाखो रूपयांची फसवणूक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फसवणूक झालेल्यांपैकी काही महिलांनी बदलापूर पोलीस ठाण्यात सदरहू दांपत्याविरोधात माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कारवाई करून फसवणूक झालेल्यांची रक्कम परत मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्त क्षेत्रातील परिमंडळ-४, उल्हासनगर मधील बदलापूर पश्चिम ठाणेत गु.र.नं. ०३/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन यातील आरोपीत यांचा शोध घेऊन त्यांना अटक करुन त्यांचेकडे सखोल चौकशी करुन गुन्हयातील फसवणूक झालेली रक्कम परत मिळविणेचे प्रयत्न सुरु आहे.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेने काळया यादीत समाविष्ट असलेल्या कंपनीस कंत्राट दिल्याबाबत**

**(६२) * २७७४१ अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेमार्फत आर अॅण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदार कंपनीस शहरातील माजिवडा जॅक्शन, पोखरण रोड क्र.२, वसंत विहार, कोपरी प्रभाग इत्यादी ५ ठिकाणच्या कामाचे कंत्राट देण्यात आले आहे तसेच सदर कामांकरिता प्रसिध्द केलेल्या निविदांमध्ये काळया यादीत समाविष्ट असलेल्या कंत्राटदार कंपनीला निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही अशी अट घालण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर अॅण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस मुंबई व ठाणे महानगरपालिकेने काळया यादीत टाकले असताना ठाणे महानगरपालिकेने काळया यादीतील या कंत्राटदार कंपनीस सदर कामाचे कंत्राट देण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रार दाखल करुन चौकशीची मागणी केली असल्याचेही दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ५ ठिकाणाची कामे आर अ‍ॅण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदार कंपनीस नव्हे तर, आर अ‍ॅण्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. या कंपनीस देण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर कामांकरीता प्रसिध्द केलेल्या निविदांमध्ये काळ्या यादीत समाविष्ट असलेल्या कंत्राटदार कंपनीला निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही अशी अट घालण्यात आली नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) उक्त विषयाबाबत स्थानिक नगरसेवकांनी, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक १९/०९/२०१६, दिनांक २३/१२/२०१६ आणि दिनांक २७/१२/२०१६ रोजी तक्रार केलेली आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे.आर अ‍ॅण्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट यांची कंत्राटदार नोंदणी deregistered केली आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त कंत्राटदारास ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात कामांचे कंत्राट का देण्यात आले तसेच इतर महानगरपालिकांनी deregister केलेल्या कंत्राटदार कंपन्यांना ठाणे महानगरपालिका क्षेत्रात काम न देण्याची अट का अंतर्भूत करण्यात आली नाही. याबाबत सखोल चौकशी करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर महापालिकेंतर्गत खुल्या क्षेत्रावर असलेली अनधिकृत बांधकामे तसेच अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(६३) * २९०११ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत मिरा-रोड शांतीनगर या गृहनिर्माण संकुलनातील मंजूर रेखांकनात दर्शविलेल्या खाजगी व खुल्या क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे तसेच अतिक्रमणे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा जागा महानगरपालिकेने देखभाल व दुरुस्तीसाठी विकासकांकडून हस्तांतर करुन घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खाजगी व खुल्या क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांचे सर्वेक्षण करुन व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी व खुल्या क्षेत्राच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांना जबाबदार असणाऱ्या विकासक व संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर व मौजे पेणकरपाडा येथील शांती नगर गृहसंकुलाच्या एकूण ११ सेक्टर्सपैकी सेक्टर १, २, ३, ४, ५, ७, ९ व ११ येथे काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे झाली आहेत.

(२) होय.

सदर गृहसंकुलातील सेक्टर १ ते ११ मधील ९८,३४८.९६ चौ.मी. इतके क्षेत्र आर.जी. अंतर्गत आहे.

या क्षेत्रापैकी इतर संस्थांकडून होणाऱ्या वापराखालील क्षेत्र वगळता उर्वरित ७३,१८४ चौ.मी. इतके आर.जी. क्षेत्र संबंधित विकासकाने नोंदणीकृत करारनाम्याद्वारे देखभाल व दुरुस्तीकरिता महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. या जागेची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(३) होय.

सदर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांचे पालिकेच्या बांधकाम विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आले आहे.

ही अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) या क्षेत्रात काही ठिकाणी झालेल्या अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांसंदर्भात मा. न्यायालयात दावे प्रलंबित आहेत. त्यामुळे या दाव्यांसंदर्भात मा.न्यायालयाने निर्देश दिल्यानंतर त्यानुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र संबंधितांविरुद्ध महानगरपालिकेकडून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तर अन्य प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून कार्यवाही प्रस्तावित असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

सदर अभिन्यासामधील आर.जी.च्या एकूण ९८,३४८.९६ चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी नोंदणीकृत करारनाम्याद्वारे देखभाल व दुरुस्तीकरीता हस्तांतरीत झालेले ७३,१८४ चौ.मी. इतके क्षेत्र वगळता उर्वरित २५१६४.९६ चौ.मी. एवढे आर.जी. क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याबाबत, त्याचप्रमाणे आर.जी. क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत ३ महिन्यांच्या आत कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील लाभार्थ्यांनी विक्री केलेली घरे नियमित करण्याबाबत**

**(६४) * २९६७९ आर्कि.अनंत गाडगीळ : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १९२६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरे दहा वर्ष विकू शकत नाही अशी अट असताना आजवर ६३ हजार घरे विकण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसआरए अंतर्गत घरे मिळालेल्यांकडून ज्यांनी ती खरेदी केली त्यांच्याकडून हस्तांतरण फी घेवून ती नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या ८६४२९ सदनिकांच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले असून त्यापैकी १३१४४ सदनिकांमध्ये अनधिकृतपणे वास्तव्य निदर्शनास आले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(ई) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या पुनर्वसन सदनिकांची भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासून १० वर्षाच्या कालावधीपर्यंत विक्री/हस्तांतरण करण्यास मनाई आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन सदनिकांची खरेदी-विक्री संदर्भात धोरण ठरविण्यासाठी मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

**अलिबाग-रोहा (जि.रायगड) या रस्त्यावरील अवजड वाहतुक रोखण्याबाबत**

**(६५) * २८०९६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-रोहा (जि.रायगड) या रस्त्याची क्षमता ५ ते १० टनाची असल्याने सदर रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उसर येथील गेल व एचपी कंपनी व मुरूड तालुक्यातील (जि.रायगड) साळाव येथील जे.एस.डब्ल्यू कंपनी या कंपनीची २० ते २५ टनाच्या वजनाची वाहने अलिबाग-रोहा या रस्त्यावरून वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबाग येथून या कंपनीच्या अवजड वाहनांची वाहतूक करण्यास बंदी असतानाही सदर वाहतूक कार्लेखिंड मार्गे अलिबाग येथून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्यावरील अवजड वाहनांची होणारी वाहतुक रोखण्याकरीता व या रस्त्यावर अवजड वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, अलिबाग-रोहा, राज्यमार्ग ९१ या रस्त्याची वाहतूक क्षमता साधारणपणे १५ मे.टन एवढे आहे. सदर रस्त्यावर भातसई येथील लहान जून्या पुलाचे पुर्नबांधकाम सुरु असल्याने याठिकाणी तात्पुरत्या तयार केलेल्या रस्त्यावरुन वाहतुक सुरु आहे. या रस्त्यावरुन १५ मे. टनापेक्षा जास्तभार वाहुन नेणा-या जड वाहनांची वाहतूक थांबविणेसाठी सहकार्य करण्याबाबत महसूल विभागास सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

(२) होय, सदर रस्त्यावर गेल व एचपी सीएल या कंपन्या असल्याने या रस्त्यावर अवजड वाहतूक होत असते.

(३) सदर मार्गावर अवजड वाहनांच्या वाहतूकीस बंदी नाही.

(४) या मार्गावर क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक करणा-या वाहनांवर मोटार वाहन कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत असते. सन २०१४ ते सन २०१६ अखेरपर्यंत अशा वाहनावर २१,५१९ केसेस दाखल करण्यात आलेल्या असून त्यांच्याकडून रुपये २४,५७,३००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील गरवारे नायलान्स कंपनीतील कामगारांची थकीत देणी देण्याबाबत**

**(६६) * २६९३८ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील गरवारे नायलान्स कंपनी ही २१ वर्षापूर्वी अचानक बंद करण्यात आल्यामुळे पिंपरी, नगर, सारोळे (जि.पुणे) येथील १,२८० कामगार बेरोजगार झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी बंद होऊन २१ वर्षे झाले तरी अद्याप कामगारांना पूर्णपणे नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर कंपनीतील १,२८० कामगारांना त्यांची थकीत देणी मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अशंत: खरे आहे, कारण गरवारे नायलान्स कंपनीची आर्थिक स्थिती डबघाईस आल्यामुळे व्यवस्थापनाने दिनांक २७/८/१९९६ पासून पिंपरी येथील कारखान्याचे उत्पादन बंद केले. त्यामुळे (१) पिंपरी, जि.पुणे, (२) सारोळे,जि.पुणे, (३) अहमदनगर व (४) मुंबई या ४ युनिटमधील एकूण १२७० कामगार /कर्मचारी बेरोजगार झाले.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आस्थापनेतील एकुण १२७० कामगारांपैकी १२० कामगारांना उपदानाची संपूर्ण रक्कम अदा करण्यात आली असुन उर्वरित ११५० कामगारांना उपदानाची अंशतः रक्कम अदा झाली असल्याने उपदानाच्या प्रलंबित रकमेबाबत मा.उच्च न्यायालयात कंपनी अर्ज क्रमांक ४६४/२०११ दाखल केला असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घाटकोपर येथे पोलिसांसाठी स्मार्ट टाऊनशिप उभारण्याबाबत**

**(६७) * २७९४२ अॅड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २५८८२ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी घाटकोपर येथे आठ हजार घरांची स्मार्ट टाऊनशिप उभारणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मार्ट टाऊनशिप उभारणीबाबत कैंव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे, यासंदर्भात शासनाच्या कालबध्द कार्यक्रमाची रुपरेषा काय आहे, तसेच सदर कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पोलीसांसाठी घाटकोपर येथे स्मार्ट टाऊनशिप उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पातील प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६८) * २७४५७ श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ दरम्यान उभारावयाच्या मेट्रो-३ प्रकल्पासाठी नरिमन पॉईंट भागातील फ्री-प्रेस जर्नल मार्गावरील राजकीय पक्षांची असलेली कार्यालये रिकामी करुन द्यावीत अशी नोटीस मुंबई मेट्रो महामंडळाने संबंधित राजकीय पक्षांना बजावली असून या प्रकल्पामुळे सुमारे ११५ घरे व २७५ व्यापारी संकुले बाधित होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकप्रतिनिधींना विधीमंडळात, मंत्रालयात विविध बैठका व जनहिताची कामे यासाठी सतत जावे लागत असल्यामुळे राजकीय पक्षांची कार्यालये विधीमंडळ व मंत्रालय परिसराजवळ असणे आवश्यक असल्याने सदरील प्रकल्पात बाधित होणा-यांना त्याच परिसरात पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: होय.
(२) फ्री प्रेस जर्नल मार्गावरील एकूण ८ राजकीय पक्ष कार्यालयांचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत मुंबई पोर्ट ट्रस्टच्या, शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई येथील ठाकरसी हाऊस इमारतीत स्थलांतरीत करण्यासंदर्भात शासनाने क्र. शाकाजा प्र.क्र.१०९/२०१५/२२, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन आदेश निर्गमित केले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेस्टच्या नवीन बस गाड्या दाखल न झाल्यामुळे**
**प्रवाश्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(६९) * २८३३७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेस्टच्या ताफ्यातील ३०० पेक्षा जास्त गाडया टप्याटप्प्याने ताफ्याबाहेर जाणार असुन त्याचा परिणाम बेस्टच्या सेवावर होणार असल्याने, तो टाळण्यासाठी बेस्टने ३०० नव्या बस गाडया खरेदी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नवीन बस गाड्या दाखल न झाल्यामुळे प्रवाश्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवाश्यांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बेस्टच्या ताफ्यातील ३०० पेक्षा जास्त गाडया ताफ्याबाहेर जाणार असल्याने बेस्टने ३०३ नव्या बसगाडया खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) नवीन बस गाडया दाखल न झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते हे खरे नाही.

(३) व (४) तथापि, प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बेस्ट उपक्रमामार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- ताफ्याबाहेर जाणाऱ्या सदर बसगाडयांची कमतरता भरुन काढण्यासाठी प्रवर्तनातील गाडयांचे प्रमाण तसेच, साध्या बस गाडयांऐवजी वातानुकुलित गाडयांचे प्रवर्तन तात्पुरत्या स्वरुपात वाढविण्यात आले आहे.
- मे. टाटा मोटर्स लिमिटेड या निर्मात्यास ३०३ नवीन बसगाडयांचा पुरवठा करण्याकरिता बेस्ट उपक्रमामार्फत दिनांक ०४/०३/२०१६ रोजी खरेदी आदेश देण्यात आले आहेत.
- बेस्टच्या ताफ्यात बसगाडयांचा समावेश करण्यापूर्वी आवश्यक असलेली ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (ARAI), पुणे या संस्थेची मंजुरी दिनांक १५/०२/२०१७ रोजी प्राप्त झाली आहे.
- तद्नंतर प्रोटो टाईप बसगाडीची तपासणी/चाचणी करुन मे. टाटा मोटर्स लिमिटेड यांना बसगाडयांचा पुरवठा करण्याबाबत दिनांक २३/२/२०१७ रोजी कळविण्यात आले आहे.
- त्यानुसार, ३०३ बसगाडयांपैकी मार्च, २०१७ अखेरपर्यंत ११५ बसगाडया व उर्वरित १८८ बसगाडया एप्रिल, २०१७ अखेरपर्यंत बेस्टच्या ताफ्यात समाविष्ट होणार आहेत.

-----------------

## पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी करण्यात आलेले आंदोलन

**(७०) * २७८४३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २४५०७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पत्रकारांना संरक्षण कायदा, पेन्शन, जाहिरात धोरण व इतर मागण्यांबाबत परभणीसह राज्यभरातील पत्रकार बांधवांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने सादर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पत्रकारांच्या विविध मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) व (३) पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्यासाठी पत्रकारांकरिता संरक्षण कायदा अंमलात आणण्याकरिता कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले असून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

पत्रकारांना पेन्शन योजना लागू करण्या संदर्भातील विविध पर्यायांची पडताळणी करण्यांत येत आहे.

नविन जाहिरात वितरण धोरण तयार करण्यासाठी अभ्यासगटाची नियुक्ती दिनांक २४ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

मजेठीया आयोगाची अंमलबजावणीबाबत उद्योग, उर्जा व कामगार विभागांतर्गत कामगार आयुक्त, महाराष्ट्र यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**चिंचोली (जि.सोलापूर) औद्योगिक वसाहतीतील एव्हान लाईफ कंपनीतील कामगार बेरोजगार झाल्याबाबत**

**(७१) * २७१८९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मोहोळ) (जि.सोलापूर) मधील एव्हान लाईफ कंपनी काही महिन्यांपासून पूर्णपणे बंद असल्याने कंपनीमधील २०० कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कंपनीतील बेरोजगार कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) आस्थापनेतील उत्पादन प्रक्रिया दिनांक १४/४/२०१६ पासून बंद असल्याने सुमारे १७७ कामगार परिणामित झाले आहेत.
(२) होय.

सदरहू कंपनीत बेकायदेशीर रासायनिक उत्पादन होत असल्याच्या कारणावरुन क्राईम ब्रँच, ठाणे यांनी दिनांक १४/४/२०१६ रोजी कंपनीस सील ठोकून त्यांचेविरुध्द मोहोळ पोलीस स्टेशन, जि.सोलापूर येथे एफआयआर दाखल केल्याचे आढळून आले आहे.

आस्थापनेतील परिणामित कामगारांना थकीत वेतन व बोनस मिळवून देण्याकरिता व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्या प्रतिनिधींच्या दिनांक १३/७/२०१६ व १०/८/२०१६ रोजी अपर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयाकडे बैठका आयोजित करण्यात आल्या व कामगारांच्या थकीत रकमा अदा करण्याचे व्यवस्थापन प्रतिनिधींस सूचित करण्यात आले.

तसेच सदर आस्थापनेविरुध्द सरकारी कामगार अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक १९/१/२०१७ रोजी वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत मे.प्रथमवर्ग दंडाधिकारी, मोहोळ, जि.सोलापूर येथे खटला दाखल केला असून तो न्यायालयासमोर प्रलंबित आहे. तसेच कामगारांच्या कायदेशीर देय रकमाबाबत उचित न्यायालयीन मार्गाचा अवलंब करणेबाबत कामगार प्रतिनिधींस कळविण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.

-----------------

## मुंबईतील बालमजुरांची सुटका करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(७२) * २७७२७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रथम या संस्थेने मुंबईतील ३०९ आस्थापनांमध्ये ४३९ पेक्षा अधिक काम करणाऱ्या बालमजुरांच्या आस्थापनांचे पत्ते, मुलांचे ठावठिकाणे, कामाचे स्वरुप यांची सविस्तर माहिती कामगार आयुक्त यांना देऊनही बालमजुरी प्रतिबंधक कायद्यांतर्गत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

प्रथम या स्वंयसेवी संस्थेने जानेवारी, २०१७ मध्ये पत्राद्वारे कळविले की, बृहन्मुंबई येथिल ७६ आस्थापनांमध्ये १३३ बाल कामगार काम करीत आहेत. त्याअनुषंगाने कृती दलामार्फत धाडसत्रे आयोजित करुन बाल कामगारांची मुक्तता करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.
(२) मुंबई शहर व उपनगरामध्ये जानेवारी व फेब्रुवारी, २०१७ दरम्यान एकूण १० धाडसत्रांचे आयोजन करुन १७ बाल कामगारांची मुक्तता करण्यात आली असून ०९ आस्थापना मालकाविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल करण्यात आली आहे. उर्वरित आस्थापनांना कृती दलाची धाडसत्रे आयोजित करुन भेटी देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात रिंग रोड उभारण्याबाबत**

**(७३) * २८५९६ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागाचा वेगाने होणारा विकास लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भिवंडी-पनवेल मार्गाला जोडणारा रुपये ८३० कोटी खर्चाचा रिंग रोड करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रिंग रोड उभारण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २७/०६/२०१४ रोजी हेदुटणे ते एसएच ३०/४० दरम्यान ३०.३० कि.मी. लांबीच्या कल्याण-डोंबिवली बाह्यवळण रस्त्याच्या कामास मान्यता दिली आहे.
(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दुर्गाडी ब्रिज ते एसएच-३०-४० दरम्यानच्या १६.०९ किमी. लांबीच्या रस्त्याच्या बांधकामासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा बोलविण्यात आलेल्या आहेत. तसेच हेदुटणे ते दुर्गाडी पूल दरम्यानच्या १४.१० किमी. लांबीच्या रस्त्याच्या बांधकामासाठी भूसंपादनाची प्रक्रिया कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

### मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्याबाबत

**(७४) * २७०७६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी आणि सतत होणारे अपघात रोखण्यासाठी तीन एक्सल, मल्टी एक्सल व ओडीसी प्रकारच्या अवजड वाहनांस सुट्टीच्या आदल्या दिवशी व सुटीच्या दिवशी ठराविक वेळेत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रवेश बंद करण्याची अधिसूचना दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास काढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस अधिक्षक, ठाणे व पोलीस अधिक्षक, पुणे यांनी सूचविल्यानुसार व विश्लेषण केल्याप्रमाणे मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील घाट सेक्शनदरम्यान तीन एक्सल, मल्टी एक्सल व ओडीसी वाहने यांना निर्बंधाबाबत दिनांक २१/०९/२०१६ रोजी पासून पुढील तीन महिन्यांकरीता अधिसूचना जारी करण्यांत आली होती.

सदरील उपाययोजनेमुळे वाहतूक कोंडी व अपघातास आळा बसल्यामुळे दिनांक २१/१२/२०१६ रोजी उपरोक्त अधिसूचना पुढील आदेशापर्यंत कायम करण्यांत आलेली आहे.

(२) द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुट्टीच्या दिवशी व गर्दीच्या वेळी सुरळीत ठेवण्यासाठी तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी खालापूर टोल प्लाझा ते उर्से टोल प्लाझा या दरम्यान तीन एक्सल, मल्टी एक्सल व ओडीसी वाहनांना पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रवेशबंदी करण्यात आलेली आहे. सदर मोहिमअंतर्गत वाहतुक कोंडीस पुर्णत: आळा बसलेला आहे. मुंबई-पुणे वाहिनी-शुक्रवारी संध्याकाळी किंवा दोन किंवा अधिक सुट्ट्या सुरु होण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी १७.०० ते २०.०० वा. शनिवारी सकाळी किंवा दोन किंवा अधिक सुट्ट्या सुरु होण्याच्या दिवशी सकाळी ०८.०० ते १२.०० वा. ठिकाण - खालापूर टोल नाका व द्रुतगती मार्गावर रा.म.०४ ला जोडणारा मार्ग पुणे-मुंबई वाहिनी - रविवारी संध्याकाळी किंवा सुट्ट्या समाप्त होण्याच्या शेवटच्या दिवशीच्या संध्याकाळी १६.०० ते २०.०० वा. सोमवारी सकाळी किंवा सुट्ट्यानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिनाच्या सकाळी ०६.०० ते ९.०० वा. ठिकाण-कुसगांव येथे रा.म.-०४ वर व उर्से येथे द्रुतगती मार्गावर डाव्या बाजूला

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोकणातील देवगड-आनंदवाडी बंदर प्रकल्पाच्या कामास सुरुवात करणेबाबत**

**(७५) * २६८३५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील नैसर्गिकदृष्टया सुरक्षित व राज्यातील पहिला पायलट प्रोजेक्ट म्हणून मंजूरी मिळालेला देवगड-आनंदवाडी बंदर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही व केंद्र शासनाची मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला केंद्र शासनाकडून त्वरीत मंजूरी मिळावी यासाठी शासनाकडून काही पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी चालू आर्थिक वर्षात किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत ५० टक्के राज्य हिस्सा व ५० टक्के केंद्र हिस्सा याप्रमाणे असून सदर प्रकल्पास दिनांक २२/७/२००४ च्या आदेशान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे व या विभागाच्या दिनांक ३/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यास केंद्र शासनाची सुधारित प्रशासकीय मान्यता अप्राप्त आहे. त्यासाठी राज्य शासनामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) चालू आर्थिक वर्षात तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील मंजूर पदे रिक्त असल्याबाबत**

**(७६) * २९४७१ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेत सहाय्यक संचालक, नगररचना हे मंजूर पद रिक्त असून मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.७६/२००८ व ५६०६/२००८ मध्ये दिनांक २३ जुलै, २००९ रोजी वा त्यासुमारास १० आठवडयात सदरचे पद भरण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले असताना आजतागायत सदर पद भरण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, उद्यान अधिक्षक, सहाय्यक नगररचनाकार, मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पात्रता नसतानाही गैरव्यवहाराचा आरोप असलेल्या अधिका-यांना पदभार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याप्रकरणात दोषी असलेल्या महापालिकेतील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनहित याचिका क्र.७६/२००८ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशास अनुसरून सहायक संचालक, नगर रचना या पदावर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून एका उमेदवाराची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदर उमेदवार महानगरपालिकेच्या सेवेत रुजू झाले नाहीत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक संचालक, नगर रचना हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे असून त्याकरिता संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना महानगरपालिकेकडून विनंती करण्यात आली आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शहर अभियंता या पदावर सध्या कार्यरत असलेला अधिकारी त्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र नसल्याने शासनाने त्यांच्या पदोन्नतीस मान्यता दिलेली नाही. मात्र शासनाच्या सदर आदेशा विरोधात संबंधित अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने शासनाच्या सदर आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येवू नये, असे आदेश पारित केले असून याचिकाकर्त्यास अंतरिमकालीन अनुतोष दिला आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंत्याची दोन पदे मंजूर आहेत. या दोन पदांपैकी एका पदावर पदोन्नतीने उमेदवाराची नियुक्ती करण्यात आली आहे. तर एका पदावर तदर्थ पदोन्नतीने उमेदवार सेवारत आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उद्यान अधिक्षक या पदांवर तदर्थ पदोन्नतीने अधिकारी सेवारत आहेत.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहायक नगर रचनाकार हे पद सद्यस्थितीत रिक्त असून या पदाचा प्रभारी कार्यभार महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविण्यात आला आहे. हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत महानगरपालिकेकडून नगररचना संचालनालय, पुणे यांना विनंती करण्यात आली आहे. सदर पद पुढील एक महिन्याच्या आत भरण्याबाबत संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निर्देश देण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा प्रभारी कार्यभार महानगरपालिकेच्या सबस्टेशन अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे.

(३) महानगरपालिकेकडून पालिकेच्या आस्थापनेवरील उक्त पदे दिर्घ काळापासून नियमितरित्या भरण्यात आलेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सदर रिक्त पदे तातडीने नियमित स्वरूपात भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश महानगरपालिकेस देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा औद्योगिक वसाहतीत गौशिया कोल्ड स्टोरेज या कारखान्यात विद्‌युत गळती झाल्याने ३ कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(७७) * २९४१४ श्री.जयंत पाटील, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा औद्योगिक वसाहतीत गौशिया कोल्ड स्टोरेज या कारखान्यात दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पहाटे ३ वाजता विद्‌युत गळती झाल्याने ३ कामगारांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कारखान्याच्या व्यवस्थापनावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कारखान्यांमध्ये तांत्रिक व अन्य कारणांमुळे दुर्घटना घडत असून जिवीत हानीसारख्या प्रकारात वाढ होत असल्याने कामगार वर्गात भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

उक्त प्रकरणी पोलिसांनी कारखान्याच्या मालकाविरुद्ध भादविसं १८६० चे कलम ३०४(अ) नुसार दिनांक ३/२/२०१७ रोजी गुन्हा नोंदविला आहे.

तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील तरतुदींच्या भंगाबाबत कारखान्याच्या व्यवस्थापनावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

या वसाहतीमध्ये कामगारांच्या सुरक्षेचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत असल्यामुळे त्या कारखान्यांतील कामगार वर्गात भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(४) १२ कारखान्यावर कारखाने अधिनियमाच्या भंगाबाबत एकूण १५ फौजदारी खटले न्यायालयात दाखल केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून वीज मंडळाच्या वीजतारा भूमिगत करण्यासाठी सादर केलेली निविदा रद्द करण्याबाबत

**(७८) * २७१४० श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजनेत पुणे शहराची निवड केली असून स्मार्ट सिटीसाठी नेमण्यात आलेल्या कंपनीकडे सुमारे ३९६ कोटी रुपयांचे भांडवल पडून असतानाही या योजनेंतर्गत शहरात एरिया डेव्हल्पमेंटसाठी निवड करण्यात आलेल्या बाणेर-बालेवाडी भागात अजूनही महानगरपालिका कोट्यवधी रुपये खर्च करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून वीज मंडळाच्या वीजतारा भूमिगत करण्यासाठी अनावश्यकपणे ६३ लाख रुपयांची निविदा मान्यतेसाठी स्थायी समिती समोर ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निविदा रद्द करुन स्मार्ट सिटीसाठी नेमण्यात आलेल्या कंपनीकडूनच हे काम करण्यात यावे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दिनांक ०२/०१/२०१७ च्या दै.केसरी, पुणे या वृत्तपत्रामध्ये याबाबत बातमी आलेली होती.

स्मार्ट सिटी अभियानाकरीता पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. ची स्थापना करण्यात आली असून, या अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून अद्याप पर्यंत रुपये २८९.०० कोटी प्राप्त झालेले आहेत. सदर निधी निरनिराळया टप्प्यावरील कामावर लवकरच खर्च करण्याचे नियोजन आहे.

तथापि, बाणेर-बालेवाडी फाटा ते लक्ष्मीमाता मंदिर या रस्ता रूंदीकरणाच्या कामाचा स्मार्ट सिटी योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये समावेश नाही.

सदर रस्ता रूंदीकरणाच्या कामासाठी एल.टी.पोल, एच.टी.पोल/पॅनल ट्रान्सफॉर्मर इ. स्थानंतरीत करणे तसेच वीज वाहिनी भूमिगत करणे अनिवार्य असल्याने रितसर निविदा मागवून स्थायी समितीच्या मान्यतेने रुपये ६३ लाख रकमेचे कार्यादेश दिनांक ११/१/२०१७ रोजी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.